# १. देव – देवी

## १. सद्‌गुरू

आरती सद्‌गुरुमाई[१] । नवल तुझे बोलू कायी ।
गुरूपदी अक्षय ठाव । वास केला देवापायी[२] ।।१।।
समाधि निरंजन । निरंजनी ठाव कैचा ।
**दासरामी** कृपा तुमची । आशीर्वाद फुकाचा ।।२।।

## २. सोऽहं देव

सोऽहं श्रीदेवाला सोऽहंची आरती ।
सोऽहंस्वरूप सद्‌गुरू करू सोऽहं भक्ती ।
सोऽहं माध्यम होता सोऽहंमय वृत्ती ।
सोऽहं स्फुरणी स्फुरते सोऽहं ज्ञानस्थिती ।।१।।
जय देव जय देव जय सोऽहं देवा ।
हंसारूढ तू दिससी तव सोऽहं सेवा ।।ध्रु।।
सोऽहं विश्वी सोऽहं माया ब्रह्मस्थिती ।
जीव शिव सोऽहं माजी एकत्वे वसती ।
सोऽहं समाधि सोऽहं स्मरणी ये निगुती ।
सोऽहं ऐसे साधन नाही त्रिजगती ।।२।।
सोऽहं गतीच पाहता सोऽहं ध्यान घडे ।
सोऽहं स्वरूप समाधि संदेहोचि उडे ।
देहभाव हा हरवुनी सोऽहं भाव जडे ।
सोऽहं **दासरामी** सोऽहं सुख जोडे ।।३।।

---

१. पाठभेद - सद्गुरूमायी   २. पाठभेद - देवाठायी

## ३. चिद् सूर्य

चिद् सूर्यात्मप्रकाशा आनंद हरि देवा ।
अखिल जगा निज भक्ती आनंदमय ठेवा ।
गायत्री जपयज्ञे हृदयी तू बरवा ।
चिदाचिदासी प्रकाशुनी विकसवी जीवभावा ।।१।।
जय देव जय देव जय जय चिद् सूर्या ।
बुद्धि दरी तम आरी वास करी हृदया ।।ध्रु।।
चिदाचिदाची गाठी पाडिसी खोलसी तू ।
साठ कळाते ग्रासुनि अग्निरूपे दीप्तू ।
निवांतपणी या भक्ता पूर्णचि निववी तू ।
**दासरामी** पूर्णचि तू द्वयाद्वय-रहितू ।।२।।

## ४. वायुदेव

आरती वायुदेवा । जय महानुभावा ।
दिगंत कीर्ती तुझी । जय जया सुदैवा ।।ध्रु।।
साधन वायुरूप । करूनी बहु वेळ ।
गुरुकृपा तुम्हावरी । तुम्हा नाही काळ वेळ ।।१।।
विनंती वायुदेवा । करुनी घ्या साधन ।
तुम्हालागी म्हणोनिया । **दासराम** शरण ।।२।।

## ५. हनुमंत

आरती हनुमंता । धन्य धन्य रामभक्ता ।
भेटवी रामराया । मागणे ते हेची आता ।।ध्रु।।
आचार भक्तीबळे । बुद्धिबळे गुरुराया ।
साधिले रामकाज । शक्ती युक्ती साधोनिया ।।१।।
पुनरपि महाराष्ट्री । धरोनिया अवतार ।
रामदास नाम धरुनी । केला धर्माचा प्रसार ।।२।।

पुनरपि अवतार । घेतलासे आपण ।
कारण अंजनीची । इच्छा करावया पूर्ण ।।३।।
धन्य कोटणीस वंश । शुद्ध ऐसे पाहून ।
हनुमंत नाम धरिले । गेला रामराया शरण ।।४।।
मातृभक्ती साधोनिया । गुरूभक्ती साधिली ।
संसार करोनिया । देखियेली मुक्त वेली ।।५।।
कीर्तनी रंगुनिया । भक्तीमार्ग चोखाळिला ।
रामरूप होवोनिया । नीतिपंथ दावियेला ।।६।।
**दासराम** चरणापाशी । लीन होवोनी ठेला ।
आशीर्वाद मागतसे । रामगुणगानाला ।।७।।

## ६. देवी

हे देवी जय देवी । जय जय देवी सुदेवी ।
अभयपदे गे वरदे । विमल सुखांबुधि दावी ।।१।।
शालिनी तू मालिनी तू । कारुण्यांबुज भावी ।
**दास** पदी **राम**चि हा । सद्गुण विभवही देवी ।।२।।

## ७
## सन्नती चंदला परमेश्वरी

आरती सन्नतीवासी । माय अखिल जगासी ।
चंदला परमेश्वरी । सर्वांतरी तू वससी ।।१।।
निरंजन निर्विकल्प । निरामय निर्विकारी ।
प्रगटली गुणरूपे । भक्तापुढे साक्षात्कारी ।।२।।
रामाजी पुण्यवंत । भक्तराय ते निर्धारी ।
दर्शनेची उपासना । कुलदेवी चिदंबरी ।।३।।
हनुमंता वोळली ते । ऐसी कीर्ती चराचरी ।
**दासराम** वंदिताची । हस्त ठेविला शिरी ।।४।।

## २. चिमड संप्रदायातील सिद्ध-त्रयी

### १. रेवणसिद्ध

**(१)**

आरती रेवणसिद्धा । जय जया सिद्ध बोधा ।
सोमेश्वर पिंडीमाजी । उदेलासी प्रसिद्धा ।।ध्रु।।
मोहक रूप तुझे । नाम मरुळसिद्ध ।
मायेसी मर्दूनिया । स्वयेचि तू काडसिद्ध ।।१।।
दुग्ध हे सेवोनिया । कैसा होसी हालसिद्ध ।
निंबरगी गुरुलिंग । रूप तुझे प्रबोध ।।२।।
**गोविंदसुत राम** । चरणी या विनटला ।
हनुमान गुरूकृपे । सहजेची लाभ झाला ।।३।।

**(२)**

आरती रेवणसिद्धा । पूर्णकाम प्रसिद्धा ।
भंडारा उधळीला । जय जया महासिद्धा ।।ध्रु।।
भस्माचे डोंगरी या । तुम्ही केली वसती ।
साधन साधुनिया । तुम्ही घेतली विश्रांती ।।१।।
चिमड महाराजे । घेतलीसे अनुभूती ।
**दासराम** शरण आला । तुम्हालागी अति प्रीती ।।२।।

**(३)**

आरती रेवणसिद्धा । शंभुस्वरूप प्रसिद्धा ।
पार तुझा न कळे वेदा । केवी कळसी या अबुद्धा ।
अवतार घेतला हो । तारावया मतिमंदा ।।१।।
करवीर क्षेत्री माया राहे । तिने पण केला पाहे ।
भिक्षेसी सिद्ध येता । अर्पी विषघट पाहे ।
प्राशन न केल्या । बंदीवासी ठेविताहे ।।२।।

मायेचा दारूण पण । होई न कोणा उल्लंघन ।
नव कोटी सिद्ध पुरूष । केले बंदीवासी जन ।
तयासी सोडवाया । रेवणसिद्ध आले आपण ।।३।।
रेवणसिद्ध तेथे आले । सर्व आनंद पावले ।
मायेचे द्वारी आले । भिक्षेलागी पुकारिले ।
धन्य धन्य रेवणसिद्ध । चमत्कार दाविले ।।४।।
मायेने विष आणिले । तव ते लिंगार्पण झाले
थिल्लरे आटली हो । विष संपोनी गेले ।
माय ते पस्तावली । बहुतचि श्रम झाले।।५।।
जिंकियेला ऐसा पण । माया आलीसे शरण ।
अनुग्रह केला पूर्ण । सोडविले बंदी जन ।
प्रचीत रोकडी हे । कैसी दावियेली जाण।।६।।
भक्तीमार्ग गाजविला । भवभ्रम निर्दाळिला ।
सोज्ज्वळ शुद्ध मार्ग । कैसा आटवोनिया दिला ।
**दासराम** शरण येता । कृपाकटाक्ष फेकिला ।।७।।

**(४)**

प्रारंभी तू देवा श्रीरेवणसिद्ध ।
माया मोहक म्हणूनी नाम मरूळसिद्ध ।
माया मोहा मर्दुनी तूचि काडसिद्ध । .
दुग्धासाठी येसी होसी हालसिद्ध ।।१।।
जयदेव जयदेव जय रेवणसिद्धा ।
आरती ओवाळू तुजला स्वतःसिद्धा ।।ध्रु.।।
गुरुलिंगरूपे येऊनी सिद्धस्वरूप जोडे ।
चिमडमहाराजांचे भजन गोड आवडे ।
हनुमत् गोविंदाते कीर्तनात आतुडे ।
गोविंदसुत रामी चरण चित्त जडे ।।२।।

**(५)**

आरती रेवणसिद्धा । जयजया सिद्धबोधा ।
सोमेश्वर पिंडीमाजी । प्रगटसी अगाधा ।।१।।
मोहक रुप तुझे । तूचि मरूळसिद्ध ।
बोधरूप विलससी । सिद्धेश्वर प्रसिद्ध ।।२।।
रेवातिरी प्रगटता । म्हणती रेवणनाथ ।
सिद्धी तव दृश्य होता । रेवणसिद्ध नाम ख्यात ।।३।।
माईसी मर्दियले । तव नाम काडसिद्ध ।
दुधाची हौस तुज । स्वये होसी हालसिद्ध ।।४।।
गुरुलिंगकृपे ऐसा । तव नामी या बोध ।
**दासरामा** सहजेची । अंतरी या आनंद ।।५।।

## २. मरुळसिद्ध

(१)

आरती मरुळसिद्धा । योगिराजा अगाधा ।
साधन साधुनिया । जगी पावला प्रसिद्धा।।ध्रु।।
मायेलागी भुलवोनी । तुम्ही घेतली विश्रांती ।
**दासरामा** भस्माचिये । आली असे प्रचिती ।।१।।

(२)

आरती मरुळसिद्धा । महा अनादि सिद्धा ।
त्रैलोक्य प्रसिद्धा । धन्य धन्य तू अगाधा ।
स्वयेचि शिव होसी । जगा बोधिले बोधा ।।१।।
करवीरक्षेत्री स्नाना आले । भिक्षेलागी पातले ।
मायेने बोलाविले । म्हणुनी तेथे सिद्ध गेले ।
प्रचीत पहावया । तिने विष भरूनी आणिले ।
विष ते प्राशियेले । विष अमृतची झाले ।
देखोनी चमत्कार । सर्वा आश्चर्य वाटले ।
गर्जोनी शिवघोष । सिद्ध निघोनिया गेले ।।३।।
अवघा झाला स्वये ब्रह्म । तोचि धन्य सिद्ध परम ।

रेवणसिद्ध सद्गुरू ज्यांचे । थकले अगम निगम ।
शेषही स्तब्ध झाला । वर्णावया कीर्ती नाम ।।४।।
रेवणसिद्ध करस्थळी । मरुळसिद्ध प्रगट झाले ।
शिव हर शब्दघोषे । शिवस्वरूप होऊनि ठेले ।
**दासराम** शरण येता । आशीर्वाद बोलिले ।।५।।

## ३. काडसिद्ध

(१)

जय जया काडसिद्धा । ब्रह्मानंदा परमानंदा ।
शिवस्वरूपानंदकंदा । मुक्त करसी जड बद्धा ।
मुखी तव नाम गाता । नुरे दुःख शोक बाधा ।।१।।
मरूळसिद्ध करस्थळी । काडसिद्ध प्रगट झाले ।
मरूळसिद्ध प्रभुराज । धन्य गुरू त्या लाधले ।
साधन सिद्धगिरी- । वरी अखंड चालविले ।।२।।
मायेसी निर्दाळिली । तिची किनरी हो केली ।
रिद्धी सिद्धी ऐसी सुखे । ज्यांनी लाथाडोनी दिली ।
धन्य धन्य धन्य मूर्ती । शिवस्वरूपी नटली ।।३।।
मायेसी पुसियेले । काय कैसे आहे माये ।
माया बोले दुरी होते । आता छातीवरी आहे ।
काडसिद्धा हसू आले । माया किनरी झुगारली रे ।।४।।
**दासराम** शरण आला । काय वर्णू प्रभूच्या लीला ।
अनुपम सुख सोहळा । पाहे भरोनिया डोळा ।
स्वर्गही तुच्छ होय । कृपा कर माथा दिला।।५।।

(२)

जय जया काडसिद्धा । योगिराजा अगाधा ।
साधन साधुनिया । जगी झाला प्रसिद्धा ।।ध्रु।।
काड हे नाम तुमचे । मायेलागी छळियेले ।
अगाध कीर्ती तुमची । **दास** वंदितो पाऊले ।।१।।

## ४. हालसिद्ध

(१)

आरती हालसिद्धा । सिद्धामाजी महासिद्धा ।
रेवणसिद्ध अवतारा । धन्य धन्य प्रसिद्धा ।।१।।
घोसरवाड ग्राम । भुक्ती मुक्ती परंधाम ।
सावित्री पुण्य श्लोक । सिद्धभक्ती परम ।।२।।
अमोलिक । ऐकुनिया भाक ।
दुग्धामृत सेवोनिया । तुवा केले कवतुक ।।३।।
तव इच्छा मात्रेकरून । गोविंद नाथ अवतीर्ण ।
संचार तया अंगी । सदा सुखसंपन्न ।।४।।
हनुमंत प्रभुआज्ञे । नित्य गोविंद कीर्तन ।
तेचि सेवा आम्हालागी । तव आशीर्वाद पूर्ण ।।५।।
चिमडाची पंचपदी । सांगलीचे कीर्तन ।
आवडी तव त्याची । **दासराम** पायी लीन।।६।।

**(२)**

आरती हालसिद्धा । पूर्णकाम प्रसिद्धा ।
आत्मबोध भंडारा हा । भुलसी सोहं ढोल नादा ।।ध्रु।।
सावित्री सेवेसाठी । घोसरवाडी साकारला ।
गोविंदनाथ हृदयी । संचरोनि राहिला ।।१।।
अप्पाचे वाडीमाजी । पंढरीची भीमाई ।
पांडुरंगे पाठविली । भली भक्ती नवाई ।।२।।
अंबील तृप्त देवा । तुझा मंत्र चांगभला ।
अपार पुण्याराशी । दत्त नामी रंगला ।।३।।
भजन चिमडाचे । प्रिय अखंड कीर्तन ।
**गोविंदसुत रामा** । आशीर्वादे आली खूण ।।४।।

(३)

आरती हालसिद्धा । पूर्ण काम प्रसिद्धा ।
आत्मबोध भंडारा हा । लुब्ध होय ढोलनादा ।।ध्रु.।।
सावित्री भक्तीसाठी । घोसरवाडी साकारला ।
गोविंदनाथ हृदयी । संचरोनी राहिला ।।१।।
अप्पाचेवाडीमाजी । पंढरीची भीमाबाई ।
दृष्टांत होवोनिया । आली सेवेसी नवाई ।।२।।
चिमड भजन प्रिय देवा । तैसे अखंड कीर्तन ।
गोविंदसुत रामा । आशीर्वादे आली खूण ।।३।।

(४)

आरती सिद्धनाथा । सिद्धबोध सिद्धांमृता ।
सिद्धानंद सिद्धरूपा । सिद्धलीला सिद्धकथा ।।ध्रु.।।
भंडारा सिद्धचित्ता । सिद्धढोल सिद्धसत्ता ।
सिद्धानुभव होता । सिद्धभक्त सिद्धपंथा ।।१।।
गोविंदसुत रामा । सिद्धसाधन गाथा ।
सुगंध सिद्ध उधळी । सिद्धहस्त सिद्धभक्त्या ।।२।।

(५)

अगाध हालसिद्धा । पंचारती माडुवे सिद्धा ।
जय जया आत्मबोधा । जगदोळू प्रसिद्धा ।।ध्रु.।।
आरती माडुत । भक्तीभाव हाडुत ।
प्रभोना निन्नभक्त । कृपा माडो कृपावंत ।।१।।
सर्वात्मक निनू । सोहंस्वरूप निनू ।
दासरामा दया माडिदी । अखंड गे प्रभंजनू ।।२।।

(६)

जय जय ज्योतिर्लिंगा महासमर्था । पंचारती माडुवे हालसिद्धनाथा ।।ध्रु.।।
रेवणसिद्ध आमेले आवतारगिद्दा । सांप्रदायदल्ली यल्लवु प्रसिद्धा ।।१।।
भक्ती प्रेम दोळू वास माडिदा । निरंजन विरामपूर्ण स्वतःसिद्धा ।।२।।
प्रेमर भक्तर महिमे अगाधा । **प्रल्हादेयू** निम्म स्वरूप तोरिसिदा ।।३।।

## ३. निंबरगीकरमहाराज आणि त्यांचे वंशज

### १. नारायणराव भाऊसाहेब निंबरगीकरमहाराज ऊर्फ गुरुलिंग जंगम महाराज

**(१)**

आरती नारायणा । धन्य जगज्जीवना ।
सगुण ब्रह्ममूर्ती । काय तपोनिधाना ।।ध्रु।।
सद्गुरू काडसिद्ध । तुकाराम अवतार ।
साधन सांप्रदाय । वाढविला बडिवार ।।१।।
गुरुलिंग जंगम नावे । जगप्रसिद्ध जहाला ।
**दासराम** शरण येता । अंतरिये बोध केला ।।२।।

**(२)**

आरती नारायणा । धन्य जगज्जीवना ।
अवतार घेतला हो । पतितांच्या उद्धरणा ।।१।।
गुरुलिंग जंगम नावे । जगप्रसिद्ध झाला ।
सत्य मार्ग परमार्थाचा । जगतासी दाविला ।।२।।
काडसिद्ध प्रभुराज । गुरू तुम्हाला भले ।
छत्तीस वर्षे साधन करूनी । गुरूराया डोलविले ।।३।।
जगता उद्धराया । गुरू आज्ञा जहाली ।
तुकाराम सगुण मूर्ती । पुनरपि प्रगट झाली ।।४।।
आपुला वाटाड्या । पांडुरंग जहाला ।
आपुलिया हातीचा प्रभु । अन्न तो जेविला ।।५।।
निंबरगी ग्राम धन्य । धन्य तव माता पिता।
**दासरामा** करी धरुनी । उद्धरावे समर्था ।।६।।

(३)

आरती नारायणा । धन्य पतितपावना ।
सर्व संता मुगुटमणी । जगज्जीवना निरंजना ।
अवतार घेतला हो । पतितांच्या उद्धरणा ।।१।।
वैराग्य बाणताचि । तुम्ही पंढरीला गेला ।
सुदृढ विवेक बळे । मायबाप ओळखिला ।
सप्त दिन ध्यान धरुनी । पांडुरंग वश केला ।।२।।
पांडुरंग प्रगटोनि । तुम्हा आशीर्वाद दिला ।
दिगंतरी गाजे कीर्ती । तुम्ही जावे सिद्धगिरीला ।
म्हणोनी आज्ञा झाली । वरदहस्त ठेवियेला ।।३।।
सिद्धगिरी जावोनिया । पुराणासी बैसले ।
काडसिद्ध प्रभुराज । पुढे उभे ठाकले ।
अधिकारी शिष्यालागी । गहुपाशी आणिले ।।४।।
गुहेचे आत नेले । तेथे पूर्ण उपदेशिले ।
मस्तकी वरद हस्त । ठेवुनी कृपेसी केले ।
ऐसी कृपा झाल्यावरी । साधन थोल चालविले ।।५।।
सिद्धकृपा झालियाची । आपण निंबरगीसी आला ।
परी पुढे साधनाचा । थोडा विसर पडला ।
आठवण द्यावयासी । गुरू जंगमरूपे आला ।।६।।
आठवण देवोनिया । दिले पूर्ण आर्शीर्वचन ।
शिष्याचे घरी केले । मोठ्या प्रेमाने भोजन ।
साधना आज्ञापोनी । अदृश्यची झाले जाण ।।७।।
छत्तीस वर्षे साधन केले । गुरू आज्ञेप्रमाणे ।
साधनसिद्धी झाली । मोठे जोडले निधान ।
जगता उद्धराया । गुरू आज्ञा झाली पूर्ण ।।८।।
गुरुलिंग जंगम नावे । जगप्रसिद्ध जहाला ।

सत्य मार्ग परमार्थाचा । जगतासी दाविला ।
तुकाराम अवतार । धन्य धन्य धन्य झाला ।।९।।
आपुला वाटाड्या । पांडुरंग तो जहाला ।
आपुलिये हातीचा । प्रभु अन्न तो जेविला ।
आपुल्या सवे देवे । बोले प्रेमाचिया बोला ।।१०।।
काडसिद्ध गुरूपरी । थोर कीर्ती जहाली ।
नामस्मरणी कैसी जिव्हा । पूर्ण रंगोनिया गेली ।
शिव शिव शिव स्मरणे । शिवरूप काया झाली ।।११।।
निंबरगी ग्राम धन्य । धन्य तव माता पिता ।
**दासराम** शरण आला । ठेवियला चरणी माथा ।
दीनावरी कृपा केली । आरती हे ओवाळिता ।।१२।।

**(४)**

आरती नारायणा । धन्य जगज्जीवना ।
अवतार तुकाराम । पतितांच्या उद्धरणा ।।१।।
काडसिद्ध महाराजा । तुम्हावरी वोळला ।
रानी वनी साधनी या । देह बहू कष्टविला ।।२।।
सुबोध सिद्धपंथ । जगामाजी वाढविला ।
**दाससराम** शरण येता । कृपाप्रसाद दिधला ।।३।।

## २. नागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर

**(१)**

आरती नागाप्पाण्णा । भक्तीचिया निधाना ।
गुरुलिंग गीतारुप । जय जया संतमान्या ।।ध्रु।।
निंबरगी वास करूनी । स्वये वैकुंठासी गेला ।
सर्वांगी भस्म तुमच्या । **दासराम** लीन झाला ।।१।।

(२)

आरती नागाप्पाण्णा । जय तपोनिधाना ।
दिगंत कीर्ती तुझी । जय जया साधना ।।ध्रु।।
साधन बहु केले । तेणे झाला विख्यात ।
भाऊसाहेबे कृपा केली । जगी झाला विख्यात ।।१।।
गुरुलिंगरूप तुम्ही । तुम्ही आमुचे स्वामी ।
**दासराम** शरण आला । मन रमले नामी ।।२।।

## ३. श्रीगुरुसिद्धप्पामहाराज निंबरगीकर

आरती गुरुसिद्धप्पा । मार्ग दाविला सोपा ।
साधन बहु केले । नव्हती गबाळ्याच्या गप्पा ।।ध्रु.।।
सद्गुरू तुम्हालागी । दत्तोपंत लाभले ।
भाग्य हे श्रेष्ठ तुमचे । **राम** वंदी पाऊले ।।१।।

***

# ४. चिमड संप्रदायातील गुरुपरंपरेतील संत व चिमड संप्रदाय

## १. रघुनाथप्रिय साधु (साधुराय, साधुराज)

**(१)**

रघुनाथप्रिय साधु भूवरी अवतरले ।
आजानुबाहू सिद्ध ब्रह्मचारी सजले ।
अखंड भजनी रंगुनी भगवत्पदी रमले ।
वाचासिद्धी झाली चमत्कार झाले ।।१।।
जय देव जय देव जय रघुनाथप्रिया ।
नाम गर्जता तुमचे हरते भवमाया ।।ध्रु।।
त्यागुनी घरदारा हरिभक्त झाले ।
साधनसिद्धी साधुनी साधु नाम आले ।
सद्गुरुभक्तीचे निशाण रोवियले ।
गुरुलिंग जंगम कृपे भगवानची झाले ।।२।।
चिम्मड ग्रामी वसती केली अखंडित ।
भाग्य आमुचे मोठे रम्य दिसे क्षेत्र ।
नित्य दर्शना येती सिद्ध साधु संत ।
शरण आलिया **रामा** ठेविती वर-हस्त ।।३।।

**(२)**

आरती साधुराया । ब्रह्मरूप गुरुराया ।
समर्थ रामदासा- । ऐसी लखलखीत काया ।।ध्रु।।
गुरुलिंग जंगमांनी । देव करुनि बैसविले ।
चिमड महाराजे । तापनाशी स्थापियेले ।।१।।
हनुमंत सद्गुरुंनी । रथयात्रे आराधिले ।
**गोविंदसुत रामे** । चरण शिरी वंदिले ।।२।।

## २. रामचंद यरगट्टीकर (चिमडमहाराज)

### (१)

रामचंद्र प्रभुराज नाथांचा अवतार ।
अगाध गुरुपदी निष्ठा त्याचा न लगे पार ।
धन्य धन्य साधू साधन करिती अपार ।
सद्गुरू समर्थ यांचा लोभ तयावरी फार ।।१।।
जय देव जय देव रामचंद्रराया ।
मुखी नाम तव गाता पाप जाय विलया ।।ध्रु।।
तन मन धन अर्पियले त्या प्रभुसेवेला ।
वैकुंठीचा देव भूतळी प्रगटविला ।
डोळे दिपोनी गेले पाहता त्या प्रभूला ।
लोका धन्यचि वाटे लागती चरणाला ।।२।।
नाही सुख धन आशा अंतरी ठेवियली ।
करूनी प्रपंच होळी नोकरी सोडियली ।
दिगंतरी सद्गुरुंची कीर्ती गाजविली ।
रघुनाथप्रिय माऊली सेवे तोषविली ।।३।।
चिमडस्थानी जाऊनी प्रभूसी पहावया ।
होईल सुख जीवा या नाश न त्या ठाया ।
शरण आलिया **रामा** केली बहुत दया ।
कृपाछत्र धरुनी वदनी गुण गाया ।।४।।

### (२)

आरती रामचंद्रा । महाविष्णु अवतार ।
भेटी होय हनुमंता । थोर दयासागर ।।ध्र।।
निंबरगी महाराज । म्हणती तुवा एकनाथ ।
येणेचि कळले हो । कोण आपण निभ्रांत ।।१।।
रघुनाथप्रिय साधु । हस्त मस्तकी ठेविला ।

सहज साधनाचा । संप्रदाय दाविला ।।२।।
पंचपदी श्रुतिगर्भ । स्तोत्र तुम्ही कथिले ।
**दासराम** प्रेमे गाता । जीवन हे उजळे ।।३।।

## ३. हणमंत पांडुरंग कोटणीस (तात्यासाहेब महाराज)

सद्गुरु भक्तीचा डंका गाजवुनी ।
कीर्तनी डोलविला गुरु राम ज्यांनी ।
संसारी दाविला सदाचार करुनी ।
गुरुरुपी तन्मय झाले काया संहरुनी।।१।।
जय देव जय देव जय गुरु हनुमंता ।
तारी जड जीवा या श्रीलक्ष्मीकांता।।ध्रु।।
**राम** लीन झाला धन्य तुझे चरणी ।
ओवाळी आरती तर मन धरुनी ।
मायबाप तुम्ही असता कैची दीन वाणी ।
उरेल माझेपाशी सांगा देव धणी।।२।।

## ४. रघुनाथ हणमंत कोटणीसमहाराज (बाबुरावजी कोटणीस)

**(१)**

आरती रघुनाथा । श्रेष्ठ हनुमंत सुता ।
सद्गुरू पितृदेव । भाग्य जोडे समर्था ।।ध्रु।।
कैवल्यधामी तुवा । त्रैमूर्ती स्थापियेली ।
तेथेची वास करूनी । अखंड सेवा केली ।
**दासरामा** आवडते । गुरूमूर्ती माऊली ।।१।।

**(२)**

आरती रघुनाथा । श्रेष्ठ हनुमंत सुता ।
सद्गुरू पितृदेव । भाग्य जोडे समर्था ।।ध्रु।।

कैवल्यधामी तुवा । त्रयमूर्ती स्थापिली ।
तेथेची वास करूनी । उपासना चालविली ।।१।।
पुण्यकाळ[१] जीवनाचा । भक्तीपंथ चालिला ।
हनुमान[२] षष्ठीचा तो । घडे अपूर्व सोहळा ।।२।।
हनुमान[३] समाधिये । तुम्ही विश्रांती घेतली ।
**दासरामा**[४] आठविली । हनुमंत माऊली ।।३।।

## (३)
## त्रैमूर्ती

आरती त्रैमूर्ती दिगंतरी गाजे कीर्ती ।
धन्य धन्य हरिभक्ती सुखद नाम गाती ।।१।।
धन्य धन्य संतराज कोटणीस हनुमंत ।
अवतार समर्थ वाढविला परमार्थ ।।२।।
मातेची इच्छा होती काही प्रपंच करावा ।
तयात देव देव गुरूकृपे जोडावा ।।३।।
मातृइच्छा पूर्ण केली कोटी कुळे उद्धरिली ।
रामायण रसामृत पूर्ण गोडी चाखिली ।।४।।
अखंड साधनी जे पूर्ण रंगोनिया गेले ।
निदिध्यासे स्मरण छंदे रामरूप होवोनी ठेले ।।५।।
कीर्तन जीवप्राण नित्य सेवा केली जाण ।
रेवणसिद्ध प्रगट झाले गुरु आज्ञाप्रमाण ।।६।।
धन्य धन्य हनुमंत गुरु रामा डोलविले ।
सांगलीचे भाग्य मोठे पुण्यक्षेत्र शोभले ।।७।।
सद्गुरू बालक रघुनाथ पिता जया सद्गुरूनाथ ।
कृपेच्या कटाक्षे तयालागी केले भक्त ।।८।।

---

१ पाठभेद - कैवल्य संकीर्तन । पुण्यकाळ आगळा । (किंवा) कैवल्य कीर्तन हे । पुण्यकाळ आगळा । २ पाठभेद - हनुमंत षष्ठीचा तो । ३ पाठभेद - हनुमंत समाधिये । ४ पाठभेद - **दासरामा** स्मरणी ते । जपमाळा राहिली । (किंवा) हनुमंत **दासरामा** । स्मरणी ते लाधली ।

रघुनाथ गुरूरूप धन्य धन्य हरिभक्त ।
वश केला देवराय स्वामी जहाले अंकीत ।।९।।
कीर्तनी रंगले जे सर्व वाहिले प्रभुला ।
अंतरीचा ठाव लाधे उणे काय विश्रांतीला ।।१०।।
कल्याणा ऐसा शिष्य पितृदेव गोविंद ।
सेवा ते पाहोनिया दावियेला स्वरुपानंद ।।११।।
जया ते झाली एक गुरुआज्ञा प्रमाण ।
नित्यनेमे प्रेमभावे चालविले कीर्तन ।।१२।।
साधनी रंगोनिया कीर्तनसुख भोगिले ।
गुरुपदी जडले चित्त राममय अंतर झाले ।।१३।।
**दासराम** लीन झाला त्रैमूर्तींचे चरणाला ।
विनवितो तुम्हालागी तारा अज्ञान बाळा ।।१४।।

## ५. चिमड संप्रदाय

आरती संप्रदाया । प्रेमभावे वंदूनिया ।
ओवाळीन संतराया । विनवोनी सदया ।।१।।
अगाध काडसिद्धा । शिवस्वरूप प्रसिद्धा ।
माया ही मर्दियेली । काय वानू महासिद्धा ।।२।।
जय जया नारायणा । जीवीचिया जीवना ।
साकार ब्रह्मतनू । गुरुलिंगा निधाना ।।३।।
लक्षुमी अक्का भली । आदि शक्ती शोभली ।
आहार निद्रा नाही । नामी रंगली माऊली ।।४।।
रघुनाथप्रिय साधू । गुरू आज्ञे करी बोधू ।
ब्रह्मचारी त्यागमूर्ती । थोर सामर्थ्य सिंधू ।।५।।
धन्य धन्य रामचंद्र । महाविष्णु अवतार ।
साधन संप्रदाय । गुरूभक्ती वरिष्ठ ।।६।।
नारायण गुरूपीठ । हनुमंत वरिष्ठ ।
**गोविंदसुत रामी** । नामावली चोखट ।।७।।

## ५. चिमड संप्रदायातील व चिमड संप्रदायाशी संबंधित अन्य संत

### १. लक्ष्मीबाई अक्का

**(१)**

आरती लक्ष्मीबाई । सर्व जगाची आई ।
जगती धन्य तूची । काय सांगू नवाई ।
अपूर्व सत्ता तुझी । करी मी वर्णन कायी ।।ध्रु।।
गुरुलिंगजंगम कृपे । जगी धन्य झाला तुम्ही ।
साधन बहु केले । **दासराम** लागे पायी ।।१।।

**(२)**

मोक्ष लक्षुमी अक्का जगती अवतरली ।
अखंड चिन्मय ज्योती तेवत जी ठेली ।
आराम निद्रा नाही काया शोषियली ।
गुरुलिंग जंगम कृपे नामी समरसली ।।१।।
जय देवी जय देवी जय लक्ष्मीबाई ।
ओवाळितो आरती प्रेमे तव पायी ।।ध्रु।।
चिमड संप्रदाया वरदायी झाली ।
भक्तजनालागी मार्गदर्शी ठरली ।
कीर्ती पहाता कैसी विश्वी दुमदुमली ।
**दासराम** हे ठेवी मस्तक पदकमली ।।२।।

**(३)**

धन्य लक्षुमी अक्का मूर्ती अवतरली ।
वाटे मुक्ताबाई पुनरपि जगी आली ।
अद्भुत शक्ती अंगी प्रभुसेवा केली ।
बहुत तपश्चर्या यत्ने साधियली ।।१।।

जय देवी जय देवी जय लक्ष्मीबाई ।
धन्य धन्य माऊली तू वंद्य जगी पाही ।।ध्रु।।
गुरुलिंग जंगम साधु समर्थ तोषविले ।
सद्गुरूचे कृपे देवा बोलविले ।
आत्मरूप जगता उघड करूनि ठेले ।
**राम** लागता चरणी डोळियात भरले ।।२।।

## २. माईसाहेबमहाराज यरगट्टीकर

आरती माईसाहेबा । जय जय स्वयंभा ।
शरण मी तव आलो । होत असे आत्मलाभा ।।ध्रु.।।
माईसाहेबांचे पती । रामचंद्र लाभले ।
सेवेशी सर्वकाळ । तन मन वाहिले ।।१।।
साधन करोनिया ।।तकार्य जहाले ।
म्हणून **दासरामे** । चरण शिरी वंदिले ।।२।।

## ३. शिवराम बुवा ब्रह्मचारी

आरती शिवरामा । जगी अगाध महिमा ।
दिगंत कीर्ती तुझी । काय न कळे आम्हा ।।ध्रु।।
चिमड महाराजे । तुवा अनुग्रह केला ।
साधन निरंतर । करोनिया धन्य झाला ।।१।।
म्हैसुरी राहुनिया । मार्ग प्रसिद्ध केला ।
मोर हा उठविला । तुझी अगाध लीला ।।२।।
म्हणुनी[१] **दासराम** । तुवा पायी लागला ।
महिमा न कळेची । वंदितसे निजभाळा ।।३।।

१. पाठभेद - चिम्मडात तुम्ही धन्य । तुवा साधन प्रमाण ।
दासराम प्रेमेचिया । तव पदी अनन्य ।।३।।

## ४. गोविंदपंत घोसरवाडकर

आरती गोविंदा । हालसिद्धप्पा मुखी सदा ।
संचार होय अंगी । नुरवी भक्तांची आपदा ।।ध्रु।।
सिद्धांची आज्ञा होता । आपण चिमडासी आला ।
नारायण महाराजे । हस्त मस्तकी ठेविला ।।१।।
नित्य चाले पंचपदी । वृत्ती मुरे आनंदी ।
भंडारा हाती येता । नाचतसा ब्रह्मानंदी ।।२।।
अप्पाची वाडी तैशी । घोसरवाडी यात्रा ।
**दासराम** आठविता । सुख होय सर्वत्रा ।।३।।

## ५. शंकरमामा शिपुरकर

**(१)**

आरती शिवशंकरा । जय तेजोभास्करा ।
दिगंत कीर्ती तुझी । थोर दयासागरा ।।ध्रु।।
परंपरा थोर गाठी । गुरू भजनाची आवडी ।
आपले पदी ठेवा । **दासरामा** ही आवडी ।।१।।

**(२)**

आरती शिवशंकरा । तुझ्या हाती भंडारा ।
हालसिद्ध नाम घोषे । होसी सकळा सोयरा ।।ध्रु।।
जनक पिता गुरू । धन्य गोविंदनाथ ।
संचारी वर्तनाची । जगी झाले विख्यात ।।१।।
दत्तोपंत करवी देवे । चिमडपंथ दाविला ।
भजन चिमडाचे । बहु आवडे देवाला ।।२।।
बाबूराव अण्णा ऐसे । श्रेष्ठ बंधु लाभले ।
परंपरा चालवोनी । ज्यांनी नाव राखिले ।।३।।
**गोविंदसुत राम** । आठवितो नाथलीला ।
अखंड कीर्तनाचा । वर देवे दिधला ।।४।।

## ६. श्रीदासरामांचे कुलदेव, अन्य पूज्य देव आणि माता-पिता

### १. रामेश्वर-सोमेश्वर

रामेश्वर सोमेश्वर ब्रह्म स्वये अससी ।
आदि शक्ती तूची जगरूपे नटसी ।
तूची माय बाप माहेर जीवासी ।
कुलस्वामी तू आमुचा तारक आम्हासी ।।१।।
जयदेव जयदेव जय रामेश्वरा ।
आरती ओवाळू गौरीशंकरा ।।ध्रु।।
आचरे ग्रामी तुमचा अवतार झाला ।
राम ईश्वर ऐक्य रूपे प्रगटला ।
जड मूढ भक्ता भक्तिमार्ग दावियेला ।
**गोविंदसुत राम** वंदीत चरणाला ।।२।।

### २. रवळनाथ

आरती रवळनाथा । जय जय देवता ।
स्वानंदवासी तुम्ही । कृपाकर ठेवा माथा ।।ध्रु।।
साधन बहु केले । गुरुकृपा ते साधियले ।
साधनाभ्यासी तुम्ही । **राम** वंदितो पाऊले ।।१।।

### ३. अन्य देव

**(१)**

कुलदैवत रामेश्वर सोमेश्वर नाथा ।
जय जय बांदेश्वरी कुलस्वामिनी माता ।

जय जय सीताराम मारुती पवनसुता ।
गुरुलिंग साधू राम सद्‌गुरू हनुमंता ।।१।।
जय देव जय देव जय जय गुरुदेवा ।
जय जय गोविंदा जय आत्मदेवा ।।ध्रु।।
उपास्य दैवत कुळीचे एकची आम्हासी ।
श्रीज्ञानेश्वर तुकया प्रिय सर्वस्वेसी ।
हरिकीर्तन विश्रांती निश्चळता ऐसी ।
**दासराम** पदी नमिता तारकची त्यासी ।।२।।

**(२)**

रामेश्वर सोमेश्वर कुलदैवत तेजे ।
सीताराम मारुती उपास्य दैवत जे ।
कोटणीस हनुमत् गुरू परमार्थी राजे ।
मामा सेवक तत्परी विराजती तेजे ।।१।।
जय देव जय देव जय श्री आत्मारामा ।
आरती ओवाळीतो जय पूर्णकामा ।।ध्रु।।
ज्ञानेश्वर तुकयादिक नारायण सेवा ।
रामनाम संकीर्तन मामांचा ठेवा ।
गोविंदाचे ठायी लाभ बहुत जीवा ।
**बालराम** सेवीतसे नामाचा मेवा ।।२।।

## ४. इंदिराबाई केळकर (श्रीदासरामांची माता)

हनुमत् सद्गुरूंची कृपा तुवा झाली ।
साधनी या रत होऊनी अखंडची ठेली ।
आहार थोडा असुनी पतिसेवा केली ।
गोविंद पती लाभे भली भाग्यशाली ।।१।।
जय देवी जय देवी इंदिरा माते ।

ओवाळू आरती तुजला गुणवंते ।।ध्रु।।
बारा अभंग तेरा वेळा तू म्हणसी ।
विठ्ठलदर्शन तुजला धन्य धन्य होसी ।
अभिष्ट साधुनी मनीचे गुरुपदी या वससी ।
**दासराम** हा वंदीत तव पदकमलासी ।।२।।

## ५. श्रीमामामहाराज केळकर (श्रीदासरामांचे पिताजी)

**(१)**

आरती गोविंदा । नित्य कीर्तनानंदा ।
सच्चिदानंदकंदा । गुरुलिंग साधु बोधा ।।१।।
हनुमंत सद्गुरू आज्ञे । केले अखंड कीर्तन ।
सर्वस्व वेचियेले । समर्पिले पंचप्राण ।।२।।
ब्रह्मचैतन्यादी संत । भाऊराव समर्थ ।
रामचंद्र नारायण । नाम बोधी हे कथीत ।।३।।
श्रीराम जयराम जय जय राम । तेरा अक्षरे परम ।
संदेश निर्वाणीचा । पायी लोळे **दासराम** ।।४।।

**(२)**

राम सीतामाई धावुनिया आली ।
मारुतीराये केली पूर्ण कृपा साउली ।
सुप्रसन्न झाली ज्ञानेश्वर माऊली ।
हनुमंत सद्गुरू मूर्ती साधनी तोषविली ।।१।।
जय देव जय देव गोविंदराया ।
आरती ओवाळितो वंदुनी तव पाया ।।ध्रु।।
सद्गुरू आज्ञे नित्य कीर्तन चालविले ।
सद्गुरूचे तव ठायी वास्तव्यचि झाले ।
कीर्तनरंगी स्वरूपा प्रचीतीसी आणिले ।

नोकरी सोडुनियाही भक्तीकार्य केले ।।२।।
हनुमंत देवा ऐसे सद्गुरू तव लाभले ।
गुरुलिंगजंगम यांचे वरदान मिळाले ।
खटावचे महाराज बोलुनिया गेले ।
निळोबांचे अवतार गोविंद शोभले ।।३।।
सद्गुरू हनुमंतांचे पुत्र रघुनाथ ।
सद्गुरू आज्ञे नित्य कीर्तन करीत ।
करिती तव गुरुबंधू आत्मरूप पहात ।
उपासना चालविली जागविला पंथ ।।४।।
रघुनाथ गोविंद धन्य धन्य जगती ।
**राम** शरण आला प्रेम धरूनी चित्ती ।
चिमडपंथाची वाढविली कीर्ती ।
कृपाछत्र प्रभूचे अखंड ज्यावरती ।।५।।

**(३)**

कीर्तनसुखाची साठी भूवरी या आला ।
कीर्तन स्वरूप श्री हनुमत् कृपा ओघ वळला ।
कीर्तनी कीर्तन प्रेमा अखंड चाखियला ।
चाखुनिया तो जगता प्रेमे चाखविला ।।१।।
जय जय कीर्तनरूपा जय जय गोविंदा ।
आरती प्रेमे करीतो जय जय स्वानंदा ।।ध्रु.।।
श्रीहरिकीर्तन सोहळा जन्माचा केला ।
कीर्तनमहिमा सकळा अपार दाखविला ।
**बालराम** चरणी ऐक्यपणे स्थिरला ।
हनुमंत गोविंदजी देखुनिया डोळा ।।२।।

(४)

अधिकारपरत्वे व्हावे महाराज ।
ऐसे ज्या मनी पहाता नसेची की काज ।
अनधिकाराने मग काय तेथ साज ।
अढळची केला भूवरी भक्तीभाव माज ।।१।।
जय देव जय देव गोविंद देवा ।
आपुली आपणचि घ्यावी गोड नामसेवा ।।ध्रु।।
माईसाहेब सांगली येवूनी सांगती ।
तव तुम्ही म्हणतले काय नेणो युक्ती ।
प्रेमेचिया धरिले चरण मागुती ।
वैखरी नाममहिमा वाढविला अंती ।।२।।
ऐसे मामा तुम्ही नसे दुजे कोणी ।
पूर्णची झाली निश्चिती जाणवया मना ।
अजाण जीवांची काय वदो कहाणी ।
**दासराम** विनटला अक्षय तव स्थानी ।।३।।

(५)

श्रीराम जयराम जय जय राम नाम सदा घोष ।
तन मन धन अर्पुनीही ज्योती मिळविली ज्योतीस ।।१।।
इंदिरावरा जय गोविंदा जय ज्योतिरूपा ।
निरंजन निरामय आरती जय निर्विकल्पा ।।ध्रु।।
अखंड कीर्तन धन्य देह तो ऐशा तव बोला ।
साच करूनिया कीर्तन महिमा **रामी** दाखविला ।।२।।

**(६)**

गुरु माय बाप गोविंदपदी ओवाळू ।।ध्रु।।

अखंड कीर्तन स्वरूप आपुले । नाद ब्रह्म केवळू ।।१।।

प्राणापानी नामस्मरणी । स्वयंज्योती निर्मळू ।।२।।

हृदयाकाशी निवास तुमचा । **बालरामी** प्रेमळू ।।३।।

**(७)**

जय जया जय जया देवा गोविंदराया ।

आरती ओवाळितो प्रेमे लागतसे पाया ।।१।।

जय रामेश्वर प्रभो तुमचा नित्य महामंत्र ।

ओहटी असुनी सिंधू उसळे पहाती सर्वत्र ।।२।।

आचरे ग्रामी नवलची झाले आठवते मामा ।

**बालराम** बोले देवे दाखविला महिमा ।।३।।

**(८)**

मनीची आर्त वृत्ती । ओवाळितो पंचारती ।।१।।

मामा तुमची आठवण । हेची नामसंकीर्तन ।।२।।

तुम्ही आहा निराकारी । आमुचा भार तुम्हावरी ।।३।।

**बालराम** पायापासी । आणिक काही नको त्यासी ।।४।।

**(९)**

गोविंद माय बापा । अखंड कीर्तनरूपा ।

ओवाळितो स्वयंज्योती । **बालराम** निर्विकल्पा ।।१।।

**(१०)**

जय जया जय जया जय जय गोविंदा ।

पंचप्राण पंचारती करितो स्वानंदा ।।१।।

श्री नागप्पाण्णा म्हणती तुम्हा अधिकारी ।
कर्णी आयकिले ते अबोल वैखरी ।।२।।
रामानंद प्रेमे स्तुती बहू करती ।
सहस्रबुद्धे स्वामी कीर्तनासी येती ।।३।।
अप्पा पोवारांनी नाम मुखी धरिले ।
आपुले कीर्तन नित्य ऐकुनी भावबळे ।।४।।
ऐसे नाही कोठे दिसले वर्म आम्हा ।
हनुमंतपदारविंदी लीन तुम्ही मामा ।।५।।
ऐसा कीर्तन महिमा अपार वाढविला ।
**बालराम** अंतरिये आनंदे धाला ।।६।।

**(११)**

ओवाळू आरती गोविंदनाथा । माझ्या गोविंदनाथा ।
सद्भावे चरणी आजी ठेविला माथा ।।१।।
ज्ञानाई दर्शने सत्य झाली गुरुभेटी ।
हनुमंतकृपे नारायणी पडे गाठी ।।२।।
ब्रह्मचैतन्य ते फिरविती पाठीवरी कर ।
अंताजींना भाकित करिती हा तो साधुवर ।।३।।
भाऊराव उमदीकर प्रसन्न त्या होती ।
माता माई वदली तुम्ही वाढवावी भक्ती ।।४।।
ज्यांचा कीर्तन नेम ऐसा असे अपूर्व ।
आदरे ऐकती रानडे श्रीगुरूदेव ।।५।।
हनुमत् सद्गुरू आज्ञे केले अखंड कीर्तन ।
निर्वाणी संदेश त्रयोदशाक्षरी गहन ।।६।।

असाध्य साही व्यथा असोनी सुहास्यची वदन ।
श्वासोच्छ्वासी उमटे जयघोष रामकृष्ण ।।७।।
श्री गुरुलिंग साधु रामचंद्र बोध फळला ।
हनुमत्पदी गोविंद पायी **दासराम** स्थिरला ।।८।।

**(१२)**

जय जय जी भक्तराया मायबापा गोविंदा ।
आरती ओवाळितो तुज कीर्तनानंदा ।।ध्रु.।।
अखंड कीर्तनाचा तुवा साधिला छंद ।
असंख्य भाविकांना उपजला प्रबोध ।।१।।
तुमचे नाम वाचे हेची आमुचे कीर्तन ।
**बालराम** प्रेमभरे दृढ धरितासे चरण ।।२।।

**(१३)**

इंदिरावरा श्रीगोविंदा ओवाळितो आरती ।
आरती करता जन्मसफलता नव्हेची की परती ।।ध्रु।।
हनुमंताचे स्कंधी आरूढ श्रीसीताराम ।
तुमचे हृदयी अखंड कीर्तनी देती आराम ।।१।।
श्रीरामाचे हनुमंतांचे वैभव हे साचे ।
**बालराम** हा आनंदोनी हरिकीर्तनी नाचे ।।२।।

**(१४)**

सर्वत्र अद्वैतस्वरुपा गोविंदा ।
मनोमाळा लावी रामनाम छंदा ।
हनुमद् सद्‌गुरू कृपे चित्तांतरी वेधा ।
अंतःकरणी वसती जय जय जय सुखदा ।।१।।

जयदेव जयदेव जय जय गोविंदा ।
आरती ओवाळीतो तुज परमानंदा ।।ध्रु।।
हृदयस्थ हनुमान दावी महिमान ।
वाचे अखंड चाले अखंड कीर्तन ।
श्रोता वक्ता एकची अनुभूती पूर्ण ।
**इंदिरासुत राम** वंदितसे चरण ।।२।।

**(१५)**

सोहंसुत आज्ञेने कीर्तन चालविले ।
दासबोधी मन रमता सहजे जे घडले ।
दृष्टादृष्टची होता एकरूपे गमले ।
एकची अद्वय होऊनी ऐक्यपणे स्थिरले ।।१।।
जयदेव जयदेव जय जय गोविंदा ।
इंदिरावरा आरती करू या स्वानंदा ।।ध्रु।।
रामनाम कीर्तन ते अखंड दुमदुमले ।
श्रवणे मनने ध्यासे जड जन उद्धरिले ।
नामची तो परमात्मा हृदयी बिंबविले ।
**बालराम** पदी धाला दृष्टी आकळिले ।।२।।

**(१६)**

जय जय जय गोविंदा । जय जय जय सुखदा ।
सत् चित् आनंदकंदा । तारक मतिमंदा ।।ध्रु।।
श्रीरामा जय रामा । जय जया रामा ।
मुनिजन मानस हंस । परात्पर सप्रेमा ।।१।।
कीर्तनरंगी रंगुनी । सांगली सुक्षेत्र ।

श्रीमत् हनुमत् । सद्‌गुरूंनी केले पवित्र ।।२।।
ती हरिकीर्तन गंगा । ओघवती ठेली ।
महात्म्य गोविंदाचे **राम** । हृदय कमळी ।।३।।

**(१७)**

कीर्तनसुखार्थ आला भूवरी जन्मासी ।
सद्गुरू शोधियेले कीर्तन सुखराशी ।
आज्ञे अखंड कीर्तनी तोषविले गुरूसी ।
कीर्तन स्वरूपची होवूनी स्थापी कीर्तनासी ।।१।।
जयदेव जयदेव जय श्रीगोविंदा ।
नित्य कीर्तनानंदा जय कीर्तनबोधा ।।ध्रु.।।
नामी कीर्तन आले नाम कीर्तनासी ।
गंगासागर मिळणी जहाली हे कैसी ।
गुरुशिष्यांचा संगम दिसतो दृष्टीसी ।
**दासराम** पदी ठेला जयजयकारासी ।।२।।

**(१८)**

जय जया जय जया जय जय गोविंदा ।
आरती ओवाळू कीर्तनानंदा ।।ध्रु।।
हरिकीर्तनासाठी जन्मासी आला ।
कीर्तनरंगी रंगूनी तन्मयची झाला ।।१।।
कीर्तन करिता करिता देहत्याग केला ।
त्रयोदशाक्षरी गर्जुनी वैकुंठा गेला ।।२।।
अखंड कीर्तन महिमा जगती वाढविला ।
कीर्तनस्वरूपे राहूनि **दासरामी** रमला।।३।।

## ७. समर्थ रामदासस्वामी संप्रदायातील संत

### १. समर्थ रामदासस्वामी

आरती रामदासा । परात्पर सर्वेशा ।
रामदास्य करूनिया । दिली सकळासी दीक्षा ।।१।।
ब्रह्मचारी राहोनिया । पुरश्चरणी रंगला ।
महाराष्ट्र जागा करूनी । कर्तव्यासी युक्त केला ।।२।।
मातेची इच्छा पूर्ण । करण्या आलासे आपण ।
नाम धरुनी हनुमान । **दासराम** आला शरण ।।३।।

### २. वेणाबाई (मिरज)

आरती वेणाबाई । काय सांगू नवाई ।
दिगंत कीर्ती तुझी । हीच असे अपूर्वाई ।।ध्रु।।
समर्थ हातियेचा । प्रसाद जो मेळविला ।
तोचि वेणाबाई । संतोषाने दिधला ।।१।।
समर्थ हातियेचा । असे प्रसाद मारुती ।
बाबूरावाकरवी । तो स्वये आणून देती ।।२।।
नवल झाले हो । बोलवेना माये ।
कथियेले काय कैंचे । वर्णवेना माये ।।३।।
श्रीराम निकेतनी । आला असे मारुती ।
पुरश्चरण होता क्षणी । घेतलीसे विश्रांती ।।४।।
ऐसे पाहोनिया सर्वा । आश्चर्य वाटले ।
प्रेमेची **दासरामे** । पाय शिरी वंदिले ।।५।।

## ३. श्रीधरस्वामी

आरती श्रीधरा । जय तेजोभास्करा ।
अपार साधन केले । नमीतसे गुरूवरा ।।ध्रु।।
सद्‌गुरू रामदास । दावी आत्मप्रकाश ।
समाधीसी प्रगट झाले । तेणे ओळला जगदीश ।।१।।
अंतरी जपमाळ । मौन सकळ साधले ।
नामरूप एक होता । दत्तरूपी प्रगटले ।।२।।
श्रीधरस्वामी राया । करीतसे प्रार्थना ।
**दासराम** मागतसे । नामी वेड लावी मना ।।३।।

✻✻✻

## ८. इंचगिरी/हिंचगिरी संप्रदायातील संत

### १. श्रीभाऊसाहेबमहाराज उमदीकर

**(१)**

आरती भाऊराया । महाराजा भक्तराया ।
गुरुसेवे धन मन । तुवा अर्पियेली काया ।।१।।
सद्‌गुरू नारायण । साधनीया डोलविले ।
श्रीगुरुराज कृपे । पतितांना उद्धरिले ।।२।।
हिंचगेरी वास करुनी । महिमान वाढविले ।
म्हणोनी **दासरामे** । चरणी मस्तक वंदिले ।।३।।

**(२)**

अद्वैताचे गूढ उकलुनी ठेवियले ।
काळ भयही ना वाटे मृत्यूला नमविले ।
द्वैतभाव सर्वांचे उखडूनी काढियले ।
भक्तीमार्ग डंका गर्जूनिया गेले ।।१।।
जयदेव जयदेव जय भाऊराया ।
आरती ओवाळितो वंदुनी तव पाया ।।ध्रु।।
अरण्यात नेमे साधन चालविले ।
हिंस्र पशू तेथे घालती वेटोळे ।
सर्प भुजंगादी डोलती ते वेळे ।
प्रकाश देवाचा भोवताली उजळे ।।२।।
व्याघ्र गाई तेथे एकत्रची होती ।
द्वैतभाव अवघा विसरूनिया जाती ।

जावयासी तेथे इतरा न छाती ।
काय दाविली जगता रोकडी प्रचिती ।।३।।
गुरुलिंगजंगम कृपे हे भाग्य आले ।
चमत्कृती पाहुनिया चकित सर्व झाले ।
अंतरीचे अज्ञान मावळूनी गेले ।
म्हणूनी **रामे** चरणी मस्तक ठेवियले ।।४।।

(३)

आरती महाराजा । संतराया भाऊराजा ।
भूतली येणे तुम्हा । साधावया भक्तीकाजा ।।१।।
साधन साधोनिया । दिव्य झाली तव काया ।
द्वैत हे मावळले । बहु आले प्रत्यया ।।२।।
सद्गुरू नारायण । भगवान डोलविला ।
**दासरामालागी** कैचा । आशीर्वाद दिधला ।।३।।

## २. श्रीअंबुरावमहाराज

(१)

आरती अंबुरावा । बहु केली गुरूसेवा ।
अहर्निश आळविले । हरी रामा वासुदेवा ।।१।।
विवरिला दासबोध । ठेवोनिया दृढभावा ।
साधन बहु यत्ने । तोषविले भाऊराया ।।२।।
**दासराम** वंदितसे । धन्य धन्य भक्तराया ।
इंचगेरी वास तुझा । ज्ञानगम्य गूढ देवा ।।३।।

(२)

नेम साधन साधुनी हरिभक्त झाले ।
दासबोध मनने तन्मय जे जहाले ।
निदिध्यास करूनी आचरणा आणिले ।
पूजनी भजनी सदा जे रंगुनिया गेले ।।१।।
जयदेव जयदेव जय अंबुरावा ।
अंतरी साठविला की गुरुभक्ती मेवा ।।ध्रु।।
वेदा अगम्य जे ते अनुभवासी आणिले ।
विरक्ती अंतरी मोठी द्रव्या त्यागियले ।
मायापाश तोडुनी मुमुक्षू बोधियले ।
संतपदासी **रामे** मस्तक नमविले ।।२।।

## ३. श्रीशिवलिंगव्वा

शिवलिंगव्वा नामे जतेमाजी जहाली ।
योगिनी बहु मोठी कशी भाग्यशाली ।
भाऊराव कृपेने उपासना केली ।
परपुरुषा न च पाही ऐसी माऊली ।।१।।
जयदेवी जयदेवी जय जय जय माते ।
आरती ओवाळू तुजला गुणवंते ।।ध्रु।।
निद्रा नाही परी जे नेमातचि रमली ।
कर्पूर जी तळहाती गुरुपुढती उजळी ।
गुरूनाथांचे पायी वंदितसे भाळी ।
सद्भक्तीपद ते **दासराम** न्याहाळी ।।२।।

## ४. श्रीरामरावमहाराज तिकोटेकर

आरती रामरावा । धन्य महानुभावा ।
साधनावरी भक्ती । जय जय मौनीबाबा[१] ।।ध्रु।।
थोर तुम्ही ब्रह्मचारी । लक्ष गुरूसेवेवरी ।
गुरूभक्ती काय वानू । घडली हनुमंतापरी ।।१।।
अखंड मौन तुमचे । लोक म्हणती साधु प्रेमे ।
परमार्थ सदैव हा । वंदियले **दासरामे** ।।२।।

## ५. श्रीकाकासाहेब तुळपुळे

आरती काकासाहेबा । तुम्हाजवळी नाम मेवा ।
दिगंत कीर्ती तुझी । तोषविले भाऊरावा ।।ध्रु।।
भाऊराव गुरू तुमचे । जगी धन्य झाला ।
**दासराम** आरती करी । तोषविले सकळा ।।१।।

***

१. पाठभेद - साधुदेवा

# ९. सांगली जिल्ह्यातील संत, साधू, एक स्थळ व एक चित्र

## १ राधाबाईअक्का गद्रे (हरिपूर)

आरती कृष्णराधा । करु आपुलिया छंदा ।
देहभाव नुरे जेथे । पावुनिया स्वानंदा ।।ध्रु।।
ब्रह्मचैतन्यासरिसे । तव भेटीसी आले ।
केडगाव नारायण । समाधान पावले ।।१।।
हरिपुरी भजनात । झाली अघटित लीला ।
**दासराम** आठवी ते । साथ करी मुरलीवाला ।।२।।

## २. श्री. लक्ष्मण दीक्षित (सांगली)

आरती दीक्षितस्वामी । सर्वश्रेष्ठ झाला तुम्ही ।
तुमच्यामुळे ज्ञान मज । झाले अंतर्यामी ।।ध्रु।।
पुण्यतिथी आज तुमची । विष्णुचिया घाटावरी ।
नाना करिती म्हणोनी । शरण **राम** अंतरी ।।१।।

## ३. श्री. गंगाधरसिंग दीक्षित (सांगली)

आरती गंगाधरा । गुरुभक्त सोयरा ।
हनुमंत समाधिये । असे जयाचा आसरा ।।ध्रु।।
यशवंतराव कर्णेकर । स्मरणार्थ पार कट्टा ।
दत्तात्रेय घडविला । त्याची वाढली प्रतिष्ठा ।।१।।
तात्या मामा आणि काका । औदुंबरी शोभले ।

गंगाधर गिरजादेवी । सेवुनिया भूषविले ।।२।।
नित्य लीन होय पंचपदी । वृत्ती राहे आनंदी ।
पत्नीस सांगितले । मेळविली संत मांदी ।।३।।
तात्यांकडे लक्ष ठेवा । ऐसे सांगुनी राहिले ।
**दासराम** म्हणे कैसे । गुरुठायी शोभले ।।४।।

## ४. शाळा नं. २ (सांगली नगरपालिका)

आरती नंबर दोन । जेथे शालेय शिक्षण ।
कवतुक वाटे म्हणून । काय वाणावे गुण ।।१।।
शालेय शिक्षण हे । शिकविती शिक्षक ।
**दासरामा** तेणे योगे । वाटतसे कौतुक ।।२।।

## ५. श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे चित्र
## (श्रीमामामहाराज केळकर यांनी रेखाटलेले)

**(१)**

ज्ञानराज गोविंदे आणियले येथे ।
आळंदीसी पहाता भरले जे चित्ते ।
रेखांकित करुनी आपुलिया हस्ते ।
घरीच देव्हाऱ्यावरी स्थापियले निरुते ।।१।।
जयदेव जयदेव जय ज्ञानरूपा ।
आरती ओवाळिता पालटते काया ।।ध्रु।।
पाहुनी ज्ञानी भक्तही चकितची ते होती ।
असेचि ज्ञानराजे आलीसे प्रचिती ।
आनंदाने डोळा अश्रु ओघळती ।
स्मरणमात्रे पावन खचितची ते होती ।।२।।

आळंदी आणिक ते पुसेसावळी ।
तेवी ज्ञानाईची जाहली सांगली ।
भाग्य आमुचे म्हणुनी दर्शन त्रिकाळी ।
**दासराम** सेवीतसे वंदुनिया भाळी ।।३।।

**(२)**

ज्ञानराज गोविंदे आणियेले येथे ।
आळंदीसी दर्शन जाहले जे निरुते ।
रेखांकित ज्ञानेश्वरी करूनी निजहस्ते ।
घरीच सांगलीसी स्थापियले वरूते ।।१।।
जयदेव जयदेव जय ज्ञाननाथा ।
ओवाळिता आरती पालटते काया ।।ध्रु.।।
पाहुनि ज्ञानी भक्तही चकितची ते होती ।
असेचि ज्ञानराजे आलीसे प्रचिती ।
आनंदाने डोळा अश्रु ओघवती ।
स्मरणमात्रे पावन खचितचि ते होती ।।२।।
ज्ञाननाथ समचरण मूर्त उभी ठेली ।
भोळ्या भाविक भक्ता वरदायी झाली ।
भाग्य आमुचे म्हणुनि दर्शन त्रिकाळी ।
**दासराम** सेवितसे वंदुनिया भाळी ।।३।।

## ६. श्रीअण्णाबुवा (मिरज)

आरती अण्णाबुवा । जय महानुभावा ।
दिगंत कीर्ती तुझी । धरियेले सद्भावा ।।ध्रु।।
सद्गुरू सिद्धनाथ । हस्त मस्तकी ठेवीत ।
साधन साधुनिया । प्रेमानंदे डुल्लत ।।१।।
**दासराम** तव पायी । प्रेमभावे लीन झाला ।
दर्शने तृप्त झाला । तव पायीच ठेला ।।२।।

## ७. श्रीगुंडुबुवा (बुधगाव)

### (१)

आरती गुंडुबुवा । जय महानुभावा ।
दिगंत कीती तुझी । जय जय महानुभावा ।।ध्रु।।
वसती तुमची झाली । बुधगांवा माझारी ।
तेथेचि राहुनिया । चमत्कार केले भारी ।।१।।
गुंडुबुवा तुम्ही धन्य । तुमचे पायी अनन्य ।
निरंतर सेवा घडो । हे मागतसे मागणे ।।२।।
मामांच्या संकीर्तनी । गुंडुबुवा नाचती ।
विदेही साधु म्हणूनी । तयालागी वाखाणती ।।३।।
दासराम पाहुनिया । जगी थक्क झाला ।
म्हणोनिया **दासरामे** । पदी ठेविले भाळा ।।४।।

### (२)

आरती गुंडुबुवा । ओवाळितो देव देवा ।
राहिला बुधगावा । जय जय महानुभावा ।।ध्रु.।।
विदेही साधु धन्य । दिसे सर्वसामान्य ।
परी तो सर्वमान्य । म्हणवोनि असामान्य ।।१।।
अनेक जडजीवा । संकटी या वाचविले ।
बोलिले होय तेचि । मृत जीव उठविले ।।२।।
गोविंद कीर्तनात । भजनात नाचले ।
पंढरीचा विठ्ठल हा । देखताचि नवल झाले ।।३।।
पहाता पहाताचि । अदृश्य होऊनी ठेले ।
तुकयापरी घडले । दासरामे वंदिले ।।४।।

### (३)

आरती गुंडुबुवा । श्रेष्ठ महानुभावा ।
पंढरीचा पांडुरंग । प्रगटलासी देवा ।।ध्रु.।।
विदेही साधु म्हणुनि । दिगंतरी कीर्ती गाजे ।
पंचक्रोशी भाग्यवान । दीपविले नीज तेजे ।।१।।

बुधगाव धन्य धन्य । पवित्र हा परिसर ।
दासराम उभा राहे । प्रेमे जोडोनिया कर ।।२।।

**(४)**

आरती गुंडुबुवा । ओवाळितो देव देवा ।
आलासी बुधगावा । जय जया महानुभावा ।।ध्रु.।।
विदेही साधु धन्य । दिसे सर्वसामान्य ।
परी तो सर्वमान्य । म्हणवोनि असामान्य ।।१।।
अनेक जडजीवा । संकटी या वाचविले ।
बोलीले होय तेचि । मृत जीव उठविले ।।२।।
गोविंद कीर्तनात । भजनात नाचले ।
पंढरीचा पांडुरंग । संती पाहता दिसले ।।३।।
देखता देखताचि । अदृश्य जहाले ।
तुकयापरी घडले । दासराम वंदिले ।।४।।

## ८. श्रीधोंडीबाबा (पलूस)

आरती धोंडीबाबा । जय महानुभावा ।
गोविंदा भेटलासे । चमत्कार सदैवा ।।ध्रु।।
धोंडीबुवा तुमची कीर्ती । जगी जहाली अगाध ।
पाहुनिया तुमचा महिमा । संता जहाला आनंद ।।१।।
गोविंदपंत तुवा । जहाले अनन्य ।
पाहुनिया महिमा हा । **दासराम** जहाला धन्य ।।२।।

## ९. श्रीधोंडीराममहाराज (इस्लामपूर)

आरती धोंडिरामा । जय चिन्मय धामा ।
विदेही मुक्तपणे । वावरती पूर्णकामा ।।ध्रु।।

ब्रह्मचि जगी आले । संत साधुसी पावले ।
गुळवणी महाराजे । केवी वंदिली पाऊले ।।१।।
मेहेरबाबा ओळखिती । तया दिली प्रचिती ।
स्वरुपानंद योगी । आंतरिक भेटती ।।२।।
जड मूढ उद्धरिले । धोंडिराम नामे तरले ।
नवसा पावताती । **दासरामे** नमिले ।।३।।

## १०. श्रीनारायणमहाराज मळणगावकर (सांगली)

(१)

आरती नारायणा । भक्तीचिया निधाना ।
जय जय ज्ञानराणा । काय वानू सुजाणा ।।ध्रु।।
तेहत्तीस कोटी देव । इंद्रायणी झाले मासे ।
आळंदी देहू येती । प्रसादाचिया सोसे ।।१।।
परी एक नवल झाले । मासा नयेचि वर ।
लाह्या उधळती भक्त । परी होती चिंतातूर ।।२।।
नारायण उधळी लाह्या । असंख्य मासे आले वर ।
प्रसाद तोषे घेती । चाकाटले नारी नर ।।३।।
मुखीचा काढिलासे । जेणे प्रकाशाचा गोळा ।
देवुनी हाती पुनः । तोची मुखी घातला ।।४।।
आत्मलिंग गुरुकृपे । जेणे प्रगट केले ।
भानुदास वोळे जया । **दासरामे** वंदिले ।।५।।

**(२)**

आरती नारायणा । भानुदास कृपा जाणा ।
साधन साधियले । मान्य झाला साधुजना ।।ध्रु।।
सांगलीत राहुनिया । केला भक्तीचा कळस ।
म्हणून **दासराम** । शरण आला तुम्हास ।।१।।

## ११. श्रीपांडुरंगमहाराज ताम्हनकर (सांगली)

(१)

पंचारती समर्थांची । करू या पांडुरंग प्रभुची ।
पांडुर अंगकांती ज्यांची । भस्मांकित तनु तेजाची ।
कंठी रुळे सदा माळा । वदनी शिवशंकर भोळा ।
शिवाय नम ॐ जप आगळा । प्रसन्न मुद्रा प्रसन्न मन ते ।
शांती चित्ताची ।।१।।
भजनी रंगुनिया गेले । भानची देहाचे सरले ।
चिदाकाशिया मन रमले । म्हणुनी अवधूत पद रमले ।
जाहले पंतरुप बरवे । विश्व ज्या तद्रुपची आघवे ।
आत्मत्वी जग सामावे । संत संगती बसती पंगती ।
आवड भजनाची ।।२।।
समर्थ ब्रह्मचैतन्य । आरुढ सिद्ध जसे मान्य ।
साधुसंत पदी लीन । देती गुंडुबुवा मान ।
करिती हनुमत् स्तव आगळा । गोविंदाची गाती लीळा ।
अंतरी संताचाची लळा । सुहास्य वदन विनम्र वाणी ।
मूर्ती प्रेमाची ।।३।।
कीर्ती वानिती सद्गुरूची । कृतज्ञता साईची ।
गुढी उभारली पंथाची । रंभापुरी वारी साची ।
अद्वैतची मनी ज्या रुजले । शब्द गुरूंचे जे अंतरीचे ।
उपासना त्यांची ।।४।।
आनंद विषयची ज्या झाला । सार्थक लागे पादाला ।
प्रेमसागर उसळीला । अवधूत चंद्रोदय झाला ।

रामानंद थोर संत । बाल मुकुंद पदी विनत ।
तत्पदी शोभती ते पंत । पांडुरंग पदी सदा आनंदी ।
परंपरा कैची ।।५।।
जयांची सदा एक तार । म्हणुनी हाती एक तार ।
तार मंद्र आणि घोर । जाणुनी तीन भेद स्वर ।
आळस हा कधी न च ज्या शिवला । चढली....जया डोळा ।
दशदिशा धुंधुकार झाला । तो प्रभू श्रीगुरू दत्तात्रय पदी ।
चाखी भजन रुची ।।६।।
कुलकर्णीसह नरहरीची । ओंजळ बहरे सुमनांची ।
काय ही प्रसन्नता यांची । द्विगुणित शोभा भक्तीची ।
पूजा जहाली या मनीची । आर्ती पुरविली भक्तांची ।
गोडी लागली चरणांची । पांडुरंग विजयी विजयो हा ।
**राम** तया अर्ची ।।७।।

**(२)**

आरती पांडुरंगा । जय जया श्रीरंगा ।
भजन कैचे आले रंगा । प्रेमे अवधूत गंगा ।।ध्रु।।
पंत शिष्यवर तुम्ही । केवी रंगला नामी ।
काम क्रोध मावळले । काय इंद्रियांचे स्वामी ।।१।।
तात्या मामावरी प्रिती । संत संता जाणती ।
धन्य धन्य तुम्ही काका । **दासराम** गाई गीती ।।२।।

**(३)**

आरती पांडुरंगा । पंतरुप अभंगा ।
गोविंदी गोविंद । जय जया श्रीरंगा ।।१।।

विचार उच्चार एक । दावियले जया ।
आचार जीवनी जो । त्रयमूर्ती अव्यंगा ।।२।।
अवधूत गंगा वाहे । तेथे भजन आले रंगा ।
आनंदाने सार्थक झाले । **दासराम** राहे उगा ।।३।।

## १२ श्रीगोविंदमहाराज दिवेकर, वाटेगाव

आरती गोविंदा । जय जया आनंदा ।
आनंद संप्रदाय । हंसरूप प्रसिद्ध ।।ध्रु.।।
वैकुंठ चतुर्दशी । जन्म झाला तया दिवशी ।
भागवत सप्ताहात । अंती साधिली एकादशी ।।१।।
वासुदेव सर्वामिती । ऐसी तुमचिये मती ।
दुर्लभ महात्मा तो । याचि दाविली प्रचिती ।।२।।
वाटेगाव क्षेत्र महिमा । वाढविला निरुपमा ।
पाहुनी आनंद तो । चित्ती होय तो दासरामा ।।३।।

***

## १०. वारकरी संप्रदायातील संत

### १. श्रीनिवृत्तीनाथमहाराज

**(१)**

आरती निवृत्तीनाथा । जगद्गुरू जगन्नाथा ।
त्रिभुवनी तूचि थोर । जय महाभागवता ।।ध्रु।।
उरली नाही वृत्ती । म्हणुनिया निवृत्ती ।
प्रवृत्ती जेथ नाही । नामी मुरली वृत्ती ।।१।।
गहिनीनाथराये । तुवा अनुग्रह केला ।
**दासराम** वंदितसे । पदी ठेवोनिया भाळा ।।२।।

**(२)**

आरती निवृत्तीराया । ज्ञानदेवा केली छाया ।
उभारिला ध्वज त्यांनी । कैची हरविली माया ।।१।।
सद्गुरू तुमचे वो । धन्य गहिनीनाथ ।
जनासी दाखविला । सुगम हा भक्तीपंथ ।।२।।
मुद्गल भट जेव्हा । करितसे विनोदा ।
बोधिली तया संध्या । **दासरामी** आनंदा ।।३।।

### २. ज्ञाननाथ / ज्ञानदेव / ज्ञानेश्वरमहाराज

ओवाळु आरती धन्य ज्ञाननाथा ।
निद्रेतुनी उत्थान करोनी जागृती देसी आता ।।ध्रु।।
वायु प्रकाश चैतन्य तुम्ही सत्य ज्ञानदेव ।
तव नामचिंतने कैचा उरे येथे ठेव ।।१।।

जयामुळे ज्ञानाज्ञान असार ती सार ।
तेथे अनुभूती म्हणुनी म्हणती ज्ञानेश्वर ।।२।।
विश्वाची माऊली निगमवल्ली प्रगट केली ।
**बालराम** पायी लोळे केली कृपेची साऊली ।।३।।

## ३. श्रीसोपानदेवमहाराज

आरती सोपानदेवा । जय महानुभावा ।
अवतार ब्रह्मयाचा । उद्धरिले जडजीवा ।।१।।
ज्ञानराज गुरूमूर्ती । प्रेमे प्रसन्न जहाली ।
सोपानदेवी सुगम । भक्तवृंदा दिधली ।।२।।
सोपान पहाताची । वाटे भक्तीसोपान ।
प्रबोध जहालिया । **दासराम** धरी चरण ।।३।।

## ४. श्रीनामदेवमहाराज

आरती नामदेवा । धन्य धन्य भक्तराया ।
विठूच्या जीवलगा । संत वंदिती पाया ।।१।।
पाषाणाचे परिस केले । चंद्रभागे तीरी जेवी ।
परिसा शरण आला । कंठी तुळसीमाळा मिरवी ।।२।।
खेचर गुरूकृपे । सर्व सत्ता आली हाता ।
संप्रदाय वाढविला । **दासराम** ठेवी माथा ।।३।।

## ५. श्रीकान्होपात्रा

आरती कान्होपात्रा । जगी प्रथम देवता ।
स्वानंदवासी तुम्ही । कृपाकर ठेव माथा ।।१।।

साधन बहु केले । पुण्याईने संचले ।
पंढरपुरामाजी । तरटीची फुले
**दासराम** वंदितसे । नित्य जोडी तिची पाऊले ।।२।।

## ६. श्री गोरा कुंभार

**(१)**

आरती गोरोबाला । जेणे वंश उद्धरिला ।
नाममय जीवन हे । भक्तीमार्ग उजळिला ।।ध्रु।।
मृत्तिका तुडविता । नामी रंगली वाणी ।
मांजराचे पिलासाठी । दिले संसाराला पाणी ।।१।।
संसारावरी ज्यांनी । तुळशीपत्र ठेविले ।
धन्य धन्य[१] जाले । **दासरामे** वंदिले ।।२।।

**(२)**

आरती गोरोबाला । जेणे वंश उद्धरिला ।
रंगले हरिनामी । भक्तीमार्ग चालला ।।ध्रु।।
मृत्तिका तुडविता । मूल सापडे चरणी ।
सद्‌गद[२] आळविता । बाळ देई चक्रपाणी ।।१।।
संसारावरी ज्यांनी तुळशीपत्र ठेविले ।
धन्य धन्य धन्य । **दासरामे** वंदियेले ।।२।।

---

१. पाठभेद - धन्य धन्य जगी
२. पाठभेद - प्रार्थना करिताची

## ७. श्रीसेनामहाराज

आरती संतसेना । जय जय भक्तराणा ।
दिगंत कीर्ती तुझी । भक्तीचिया निधाना ।।१।।
बादशहालागी कैचे । रूप दाविले आयनी ।
पहाता वरी सेना । आत दिसे चक्रपाणी ।।२।।
पांडुरंगी मन रंगले[१] । होवुनिया[२] निवांत ।
**दासराम** संतापायी[३] । लीन झाला तटस्थ ।।३।।

## ८. संत श्रीसावता माळी

आरती सावता माळी । गुरुकृपा लाभली ।
साधन साधुनिया । जगी कीर्ती लाभली ।।ध्रु।।
देवाचा मळा केला । ऊस तेथे पिकविला ।
जाई जुई शेवंतीला । बहु बहार आला ।।१।।
ऐसे हे सावताजी । सर्व संतांसी मान्य ।
म्हणून **दासराम** । तयालागी शरण ।।२।।

## ९. श्रीएकनाथमहाराज

### (१)

आरती एकनाथा । संतराया समर्था ।
पताका भागवत । फडके ही तुझी सत्ता ।।१।।
पांडुरंग टाळ धरी । केवी तुमचे कीर्तनी ।
चंदन स्वये घासी । कावडीने भरे पाणी ।।२।।

१. पाठभेद - मोहिले  २. पाठभेद - राहुनी निवांत
३. पाठभेद - हरिचरणी लीन झाला । दासराम निवांत ।।२।।

दासोपंत चरणी शरण । दत्तात्रेय दारी पहाता ।
**दासराम** निवांतचि । पायी ठेवितो माथा ।।३।।

**(२)**

आरती एकनाथा । महाभाग्यवंत भक्ता ।
कीर्तनी रंगोनिया । रंगविले कृष्णनाथा ।।१।।
संसार आचरोनी । परमार्थ साधिला ।
भोळ्या भाविकासी सोपा । भक्तीमार्ग दाविला ।।२।।
पुनरपि येवोनिया । धरिले रामराय नाम ।
परमार्थ वाढविला । शरण आला **दासराम** ।।३।।

**किंवा**

पुनरपि येवोनिया । चिमड ग्रामी राहिला ।
रामराय नाम धरूनी । परमार्थ वाढविला ।।३।।
**दासराम** लीन झाला । आतुर होवोनिया ठेला ।
देवाची भेटी व्हावी । ऐका येवढे कृपाळा ।।४।।

**(३)**

आरती एकनाथा । जय जया समर्था ।
जन नोहे जनार्दन । अनुभव हा चित्ता ।।ध्रु।।
तुका म्हणे भागवत । केले श्रुत सकळा ।
मुक्तीवरील[१] गुरुभक्ती । मागे उद्धव स्तुतीला ।।१।।
माऊलीचा अवतार । नाथा[२] म्हणती नारीनर ।
समाधी संजीवन । दावियली[३] साचार ।।२।।

---

१. पाठभेद - आनंद संप्रदायी । अधिकार आगळा २. पाठभेद - बोलती हे नारीनर।
३. पाठभेद - जेणे दाविली साचार

ज्ञानेश्वरी[१] शुद्ध पाठ । थोर उपकार केला ।
अखंड कीर्तनानें । देव ऋणीच ठेला ।।३।।
जनार्दन एकनाथ । ध्वजा लाविली भागवत ।
साधुसंत गात कीर्ती । **दासराम** वंदित ।।४।।

## १०. श्रीतुकाराममहाराज

आरती तुकारामा । देई दर्शन आम्हा ।
करोनि पवित्र भक्ती । मार्ग दाखवी आम्हा ।।१।।
धन्य तुम्ही भाग्यवंत । कुळवंत श्रीमंत ।
नीतिवंत होवोनिया । मेळविला भगवंत ।।२।।
कीर्तनी रंगोनिया । देव आपुलासा केला ।
पांडुरंगी मिळोनिया । जगा मार्ग दाविला ।।३।।
पुनरपि प्रगटोनी । धरिले नारायण नाम ।
जगासी उद्धरोनी । **दासरामा** दिले नाम ।।४।।

**(२)**

आरती तुकारामा । स्वयं ब्रह्म परंधामा ।
नवलाव जगी केला । स्वये गेला निजधामा ।।ध्रु।।
कंठ ऊर जीवन करूनी । लिंगदेहे विमानी ।
आरूढ होऊनी गेला । आज्ञापी जे चक्रपाणी ।।१।।
निर्वाण अभंगा हे । गावोनिया निर्वाणी ।
नारायण महाराज । ऐक्य झाले नारायणी ।।२।।
अभंग परंपरा । लाधली जे रामचंद्रा ।

१. पाठभेद - ज्ञानेश्वरी शुद्ध करोनी ।

हनुमंतराया तेची । दिली निज-योग-मुद्रा ।।३।।
संग्रही रघुनाथा । आले कृपेचे गूज ।
संप्रदायी निर्याणी जे । गाती विश्वाचे बीज ।।४।।
अक्षरी उजळोनी । दीप मार्ग दाविले ।
सदेह तुकाराम । वैकुंठासी केवी गेले ।।५।।
तुका बैसला विमानी । संत पाहती लोचनी ।
वच ते सार्थ केले । टाकी महाराज यानी ।।६।।
अभंग निर्याणीचे । भक्ता पवती निर्वाणी ।
गुरू भाईकृपे खूण । ग्रंथी दाविली निशाणी ।।७।।
हनुमंत **दासरामा** । कृपा जाली समाधानी ।
गुणकीर्ती गावोनिया । भक्तीप्रेम साधनी ।।८।।

## ११. बहिणाबाई (श्रीतुकाराममहाराज शिष्या)

आरती बहिणाबाई । नवल ते सांगू काई ।
साधन बहु केले । जगी दाविली नवाई ।।ध्रु।।
बहु त्रास सोसियेले । तुकोबाचे कीर्तन ।
तुकोबा पांडुरंग । सर्वा आले दिसून ।।१।।
संतांचे महिमान । एक संतची जाणती ।
**दासरामा** कृपा करी । पाय ठेवितो चित्ती ।।२।।

## १२. विष्णुबुवा जोगमहाराज

आरती जय विष्णु । ज्ञानाग्रणी ज्ञानभाना ।
ज्ञानेची वैराग्य ज्या । थोर कृपानिधाना ।।१।।

पंढरीचा वारकरी । झळकला पुण्यनगरी ।
स्वानंद सुखवासी । स्वानंदाची लहरी ।।२।।
अनंत जन्मोनी जो । ज्ञानराजा वाही डोई ।
पालखीचे सोहोळ्यात । देहभान हरुनी जाई ।।३।।
ज्ञानेश्वरी वदनी ज्या । हृदयी ज्ञानेश्वर डोले ।
अनुग्रह ज्ञानाईचा । **गोविंदसुत** पायी लोळे ।।४।।

## १३. श्रीसोनोपंत ऊर्फ शं. वा. दांडेकर

आरती शिवशंकरा । सोनोपंत ज्ञानशूरा ।
भागवती धर्मराजा । कीर्तीमान दांडेकरा ।।ध्रु।।
परमार्थी राज्यधारी । शिरला मनुजांचे अंतरी ।
विष्णुबुवा जोग कृपा । वारकरी ब्रह्मचारी ।।१।।
प्रवचन निरूपण । ज्ञानेश्वरी प्रगटन ।
प्रगटवी अर्थ जगी । तोषे ज्ञानेश भगवान ।।२।।
राखे सकळांचे अंतर । भाग्य आले अपरंपार ।
**गोविंदसुत राम** । राहे जोडोनिया कर ।।३।।

***

# ११. अन्य संत – साधु

## १. श्रीअक्कलकोटस्वामी

अक्कलकोट स्वामीराजा । जय जया महाराजा ।
साधन साधुनिया । नेम दाविला ओजा ।।ध्रु।।
निंबर्गी महाराजा । तुम्ही केला अनुग्रह ।
साधन साधुनिया । केला असे निग्रह ।।१।।
चोळाप्पालागी तुम्ही । सर्प अनुभव दिला ।
**दासराम** लीन झाला । नित्य वंदितो पाऊला ।।२।।

## २. श्रीअडाणेश्वरमहाराज (अमरावती)

आरती अडाणेश्वरा । सर्वात्मक ईश्वरा ।
स्वकर्म कुसुमांची । पूजा करू अपारा ।।ध्रु।।
अडाणा राग जैसा । शोभतसे गाव नाव ।
दादाजी अडाणा हा । दावितसे परमार्थ ।।१।।
ज्ञान हे सारूनिया । जो का होय अडाणी ।
तयालागी भेटतसे । साकार हा चक्रपाणी ।।२।।
**दासराम** संत वेडा । गात असे प्रेमभरे ।
आनंद बहु झाला । काय सांगू एकसरे ।।३।।

## ३. अमलानंद स्वामी

आरती अमलानंदा । स्वरूपी या अभेदा ।
साकार जगी जहाला । धन्य धन्य सोहंनादा ।।ध्रु.।।
नादरूप तुम्ही स्वामी । जय जया सत्य नामी ।

नाम नामी एक झाले । जेथ नुरल्या उर्मी ।।१।।
आनंद संप्रदाय । आनंदाचे स्वरूप ।
पहाता पहाताचि । जीव होय तद्रुप ।।२।।
जगद्गुरू जगन्नाथ । गिरनारी प्रभू दत्त ।
आलिंगन दिले असे । पहाताची रेवणनाथ ।।३।।
**दासरामालागी** कैचा । स्वरूपाचा सोहळा ।
दाविला जीव तेथे । गुंतोनिया राहिला ।।४।।

## ४. श्रीकमलाकर वालावलकर

## (श्रीदिगंबरदासमहाराजांचे शिष्य)

आरती वालावलकरा । जय तेजोभास्करा ।
दिगंत कीर्ती झाली । जय तेजोभास्करा ।।१।।
साधन बहु केले । काया झिजविली सारी ।
**दासराम** शरण आला । तयावरी कृपा करी ।।२।।

## ५. श्रीकार्तिकस्वामी (पंचायतन) (कोल्हापूर)

आरती कार्तिकस्वामी । जगी मान्य झाला तुम्ही ।
साधन साधुनिया । तुम्ही रंगला नामी ।।ध्रु।।
कार्तिकस्वामी श्रेष्ठ । हे तो जहाले स्पष्ट ।
**दासराम** रंगलासे । गुण गाऊनी वरिष्ठ ।।१।।

## ६. श्रीकृष्णाजीपंत

आरती कृष्णराया । तुमची धन्य झाली काया ।
दिगंत कीर्ती तुमची । सांभाळिले अनाथा या ।।ध्रु।।

राघवेंद्रस्वामी । तुम्हा गुरू लाभले ।
**दासरामे** वंदियेले । तुमची बरवी पाऊले ।।१।।

## ७. श्रीगजाननमहाराज (शेगाव)

आरती गजानना । परब्रह्म निरंजना ।
विदेही साधू धन्य । जय जया पावना ।।ध्रु।।
लोकमान्यालागी ज्यांनी । दिला असे प्रसाद ।
गीतारहस्य हा ग्रंथ । जगी झाला प्रसिद्ध ।।१।।
चरित्र पारायणी । पुरती मनकामना ।
**दासराम** चरणी लागे । करी नामसंकीर्तना ।।२।।

## ८. श्रीगुलाबरावमहाराज

आरती गुलाबरावा । जय महानुभावा ।
सदैव कीर्ती तुमची । जय देवाधिदेवा ।।ध्रु।।
ज्ञानेश्वर सुत म्हणोनी । जगी कीर्तीमान झाला ।
दर्शन मामांनाही । **दासराम** ठेवी भाळा ।।१।।

## ९. श्रीगोविंदबुवा (तासगाव)

आरती गोविंदबुवा । जय महानुभावा ।
लोकमान्य कृपा करी । जय जया सदैवा ।।१।।
साधन बहु केले । धन्य झाला अवनी ।
तुम्हासवे वाघ येती । स्वये जाती निघोनी ।।२।।
निपुत्रिका पुत्र होती । ऐसी तुमची ख्याती ।
**दासराम** वंदितसे । तुम्हालागी अति प्रीती ।।३।।

## १०. श्रीजनार्दनस्वामी (श्रीएकनाथांचे गुरू)

आरती जनार्दना । जय पुण्यपावना ।
विदेही साधू धन्य । निरंजन नारायणा ।।ध्रु।।
कीर्तनासी एकनाथा । प्रेमे सनद दिधली ।
**दासरामा** आठविली । गुरुमूर्ती माऊली ।।१।।

## ११. श्रीजलाराममहाराज (सौराष्ट्र)

आरती जलारामा । तुमचा अगाध महिमा ।
दिगंत कीर्ती तुमची । पूर्ण कैवल्यधामा ।।ध्रु।।
तुम्ही तरी सत्वसिद्ध । जगामाजी प्रसिद्ध ।
लौकिक तुमचा हा । जगी सर्वत्र सिद्ध ।।१।।
**दासराम** तुम्हा पायी । प्रेमभावे शरण आला ।
तयावरी कृपा करा । पदी ठेवितो भाळा ।।२।।

## १२. श्रीजयरामस्वामी वडगावकर

आरती जयरामा । पूर्ण कैवल्यधामा ।
निर्गुण रूप तू होशी । जय कैवल्यधामा ।।ध्रु।।
कैवल्यधामात । तुमचे विश्रांतीस्थान ।
**दासराम** पदी लागे । भोळी भक्ती पाहून ।।१।।

## १३. श्रीतेलीमहाराज (शिरोळ)

जय जया जय जया जय नाथ राया ।
दर्शन घडले तुमचे वंदितसे पाया ।।ध्रु।।
तेलीमहाराजे नवल हे केले ।

ऐसे नाही कोणी कोठे देखियले ।।१।।
आपण येथे वास्तव्यचि केले ।
शिरोळ स्थान पाहून समाधान झाले ।।२।।
ज्ञानेश्वरी पारायणा भक्तीचा सोहळा ।
अखंड वीणा आणि मुखी नाममाळा ।।३।।
तात्यामहाराज भक्त करी गोळा ।
गुरुलिंगजंगमकृपे **दासराम** धाला ।।४।।

## १४. श्रीदिगंबरदासमहाराज (पुणे)

आरती दिगंबरा । जय तेजोभास्करा ।
दिगंत कीर्ती तुझी । जय कृपाभास्करा ।।ध्रु।।
बाबांनी कृपा करूनी । स्वये धरिली सावली ।
दिगंबरदास धन्य । गुरुमूर्ती शोभली ।।१।।
दिगंबर नाथपंथी । जगी जहाली कीर्ती ।
अशोक पुत्रालागी । स्वये प्रेमे कुरवाळिती ।।२।।
काय तव कीर्ती वानू । नामेची भीतरी ।
**दासराम** वंदितसे । तयावरी कृपा करी ।।३।।

## १५. श्रीधुंडिराज विनोदमहाराज (पुणे)

आरती धुंडिराजा । जय जया संतराजा ।
गणपती गणराजा । वंदियले महाराजा ।।ध्रु।।
मातेचिया स्वप्नी केवी । स्वये आले चिंतामणी ।
तेची बाळ पुढे झाले । नुरलीच चिंता मनी ।।१।।
विवेकानंदा ऐसे । अवतार कार्य केले ।

विज्ञान बुद्धिनिष्ठ । डोळे तयांचे दिपले ।।२।।
गोरक्ष मच्छेंद्र हे । संचरती जये ठायी ।
अधिकार फार मोठा । **दासराम** प्रेमे गाई ।।३।।

## १६. श्रीनीलकंठ भारती (विठ्ठलवाडी)

आरती नीळकंठा । जय वैकुंठ पीठा ।
वैकुंठवासी तुम्ही । स्वये गेला वैकुंठा ।।ध्रु।।
गोविंद गुरू भारती । हस्त मस्तकी ठेविती ।
नीलकंठ गुरू भारती । जगप्रसिद्ध होती ।।१।।
व्यसनमुक्ती कार्य । ज्यांनी शतायुषी केले ।
जड मूढ अज्ञ जीवा । मार्ग दावूनी गेले ।।२।।
जीवदान कोणा दिले । निपुत्रिका पुत्र झाले ।
ज्ञानेश्वरी पारायण । निरक्षरा करविले ।।३।।
जमला संतमेळा । नामघोष चालिला ।
विठ्ठलवाडी माजी । समाधीचा सोहळा ।।४।।
कार्तिकी एकादशी । विठोबाचा बुधवार ।
विठ्ठल नवरात्र । साधियेली दुपार ।।५।।
सांगलीसी येवुनिया । **दासरामा** भेटले ।
निरोप घेवुनिया । ब्रह्मरूप जहाले ।।६।।

## १७. श्रीपंतमहाराज बाळेकुंद्री

आरती अवधूता । आदिनाथा गुरूदत्ता । देवाधिदेव तुम्ही । बालमुकुंद सत्ता ।।१।।
अदेह खरे तुम्ही । म्हणोनिया विदेह । जगदोद्धारालागी । दावियेला काय देह ।।२।।
करवीरी तव मूर्ती । जेथे सिद्धांची वसती । सागरापरी लीला । दासराम कळेचिना जगती ।।३।।

## १८. श्रीबाळूमामा (आदमापूर)

आरती बाळूमामा । तुझा अगाध महिमा ।
साधु संत सिद्ध येती । हा तो अगाध महिमा ।।ध्रु।।
बाळूमामा तुवा थोर । साकार वारंवार ।
**दासराम** शरण आला । प्रेमे जोडोनिया कर ।।१।।

## १९. श्रीमनामाता (कनकेश्वर)

आरती मनामाता । उन्मनी अवस्था ।
त्रयमूर्ती जयापाठी । कृपावर देता ।।ध्रु।।
अखंड चक्रपाणी । नामे अंकिला ज्यांनी ।
परिपूर्ण परमार्थी । दिव्य तेज लोचनी ।।१।।
कनकेश्वरी वास केला । सांगुनिया सकला ।
**दासराम** वंदितसे । भाव पाहुनी भोळा ।।२।।

## २०. श्रीमहादबा पाटीलमहाराज (नरसोबावाडी)

### (१)

आरती संतराजा । महादबा महाराजा ।
साधुसंत मुग्ध होती । पाहुनिया भक्तीकाजा ।।ध्रु।।
नरसोबावाडी क्षेत्र । जगी थोर पवित्र ।
तेथेची वास केला । ख्याती झाली सर्वत्र ।।१।।
पाटील महाराज । दत्तगुरू गजर ।
विभुती लाविताची । थोर होय चमत्कार ।।२।।
सुख दुःख विसरले । घडताचि दर्शन ।
अनुभव सज्जनांचा । करी **दासराम** गान ।।३।।

(२)

पाटील महाराजा ओवाळू आरती । वाऱ्यासरशी तुमची दिगंतरी कीर्ती ।
अवधूत योगी तुम्ही परब्रह्ममूर्ती । असूनी विदेही जहाली राजयोग ख्याती ।।१।।
जयदेव जयदेव जय पाटीलमहाराजा । ओवाळू आरती दत्तगुरूराजा ।।ध्रु.।।
सोटा हाती पहाता अरिष्टे पळती । मंगल होय जगाचे लाविताची विभूती ।
नरसोबावाडीची वारी ही पुरती । स्वरूपाकार होऊनी दत्तगुरू प्राप्ती ।।२।।
पूर्णज्ञानी तुम्ही दासबोध कथिता । ज्ञानेश्वरी तुकया भागवता पढता ।
थक्क होती ज्ञानी नमवुनिया माथा । रामानंद कृपा ही काय वानू आता ।।३।।
रामानंद बोले मजवरी ज्या परीने । तुम्ही कौतुक केले तैसे त्या परीने ।
भाविक भक्ता लाभ भक्तीचे लेणे । गौरव अमलानंदा पूर्ण समाधाने ।।४।।
स्वरूपानंद समाधी सोहं ऐकियले । ऐसे नाही कोठे कर्णी आयकिले ।
तुम्हीच अण्णाबुवा हेचि मनी आले । **दासराम** वंदी प्रेमे पदकमले ।।५।।

## २१. श्रीमामासाहेब देशपांडे (पुणे)

आरती श्रीपादा । जय जया प्रसिद्धा ।
दत्तप्रभू जन्म घेती । नवल हे बहु सिद्धा ।।ध्रु।।
पार्वती मातेने । तुवा अनुग्रह केला ।
शक्तिपात दीक्षा जैसी । तुवा नेम चालविला ।।१।।
पाटील आदि करुनी । तुजलागी भेटले ।
साधन पाहुनी । प्रेमे कौतुक केले ।।२।।
वामनराये तुवा । श्रीमंतची केले ।
म्हणोनी **दासरामे** । पदकमल वंदिले ।।३।।

## २२. श्री राम मारुतीमहाराज (कल्याण)

आरती राममारुती । जगी विख्यात कीर्ती ।
दिगंत कीर्ती तुझी । जगी जहाली ख्याती ।।१।।
काय वानू तव कीर्ती । सद्गुरू भेटले म्हणून ।
**दासरामे** चरण । शिरीच वंदिले ।।२।।

## २३. श्रीवजीरबाबा (औरवाड)

आरती वजीरबाबा । धन्य साधू सदैवा ।
दिगंत कीर्ती तुझी । जगी वाढली सदैवा ।।ध्रु।।
औरवाडी राहुनिया । तुवा साधना केली ।
संतांनी पाहुनिया । थक्क थक्क झाली ।।१।।
केवळ तव कृपे । **दासराम** जन्मा आला ।
विसरावे कैसे आता । तव पायी लीन झाला ।।२।।

## २४. श्रीवर्धमान महावीर (जैन धर्म संस्थापक)

### (१)

आरती वर्धमाना । जय जया महिमाना ।
नवल कीर्ती तुझी । मना आणिली मना ।।ध्रु।।
वर्धमान धन्य तुम्ही । जगी जाहली कीर्ती ।
**दासराम** शरण तुवा । मनी दिलीसे प्रीती ।।१।।

### (२)

आरती महावीरा । जय तेजोभास्करा ।
दिगंत कीर्ती तुझी । ठेवा कृपेचिया करा ।।ध्रु।।
महावीर तुम्ही । जगी झाला प्रसिद्ध ।

जितेंद्रिय होवोनिया । मार्ग दाविला सिद्ध ।।१।।
महावीर पंथ तुम्ही । जगी प्रथम दाविला ।
अहिंसा धर्म तुवा । जगालागी स्पष्ट केला ।।२।।
भुजंगा स्वये तुम्ही । निजहस्ते कुरवाळिले ।
वाघाचे वाघपण । कैसे जिरोनिया गेले ।।३।।
जैन धर्म संस्थापक । जगी प्रसिद्ध झाला ।
म्हणावोनी **दासराम** । पदी ठेवी निज भाळा ।।४।।

## २५. श्रीवामनमहाराज गुळवणी (पुणे)

**(१)**

आरती वामनराया । तव लखलखीत काया ।
रामदासा ऐसी तनू । केली सर्वांवरी माया ।।ध्रु।।
स्नानसंध्या नित्य नेम । जप तप अनुष्ठान ।
साधन सर्वकाळ । भाव शुद्ध वर्णी कोण ।।१।।
गोविंद गुरुस्वामी । तुवा मार्ग दाविती ।
टेंबेस्वामी गाठ होता । कुंडलिनी प्रचिती ।।२।।
लोकनाथ तीर्थे तुवा । केला असे शक्तिपात ।
**दासरामा** प्रेम दिले । भक्तिभावे नमीत ।।३।।

**(२)**

आरती वामनराया । करा कृपेची छाया ।
सगुण ब्रह्ममूर्ती । करा सर्वांवरी माया ।।ध्रु।।
गोविंदस्वामी तुवा । दावियला निजपंथ ।
वाटही दावियेली । टेंबेस्वामी कृपाहस्त ।।१।।

वामनराये तुवा । दावियेला सुपंथ ।
माताजी दया करी । सदा कृपेची सावली ।।२।।
दासरामा घरी । तुवा स्वयेचि आला ।
प्रसाद रुपाया तो । तुवा मस्तकी लाविला ।।३।।
**दासराम** तुम्हालागी । प्रेमे जहाला शरण ।
शिर हे तवपदी । ठेले लवुनी अनन्य ।।४।।

## २६. श्रीविवेकानंद (स्वामी)

आरती विवेकानंदा । जय जया अगाधा ।
त्रिभुवनी तूची थोर । जगी पावला प्रसिद्धा ।।ध्रु।।
विवेक आनंद तुम्ही । देतसा आनंदा ।
आनंदमय तूची । जय जया प्रसिद्धा ।।१।।
रामकृष्णे कृपा केली । जगी धन्य ती माऊली ।
शारदा मातेनेही । दिली असे सावली ।।२।।
विवेक आनंद । एकमेव आनंद ।
आनंदमय तुम्ही । देता **दासासी** आनंद ।।३।।

## २७. श्रीव्यासमुनी

जय जया व्यासमुनी । बहु साधन करुनी ।
तपश्चर्या तुवा केली । ख्याती झाली त्रिभुवनी ।।ध्रु।।
निनाई मातेपुढे । जिता मारती बोकड ।
रुचेचिना संतालागी । म्हणुनी निघाले उदंड ।।१।।
प्रसन्न झाली देवी । व्यासदृष्टी ही देखोनी ।
**दासराम** चरणी लागे । मनी विनम्र होऊनी ।।२।।

## २८. श्रीशंकराचार्य (आद्य जगद्‌गुरू )

आरती शिवशंकरा । जय तेजोभास्करा ।
दिगंत कीर्ती तुझी । जय जयाजी कृपा करा ।।ध्रु।।
आवळ्यांचा पाऊस पाडला । ख्याती झाली दिगंती ।
**दासराम** शरण आला । पायी जडली प्रीती ।।१।।

## २९. श्रीसदानंदमहाराज (श्रीमुक्तानंदांचे शिष्य)

आरती सदानंदा । जय आनंदकंदा ।
सगुण ब्रह्म तूची । जय जया स्वानंदा ।।ध्रु।।
मुक्तानंद गुरू तुमचे । तेणे अनुग्रह केला ।
म्हणोनी तव पायी । **दासराम** लीन आला ।।१।।

## ३०. श्रीसूरदासमहाराज (कुची)

आरती सूरदासा । भक्तराजा सर्वेशा ।
साधन साधुनिया । तुम्ही दिला दिलासा ।।ध्रु।।
निंबरगी संप्रदायी । तुम्ही सहजेची आला ।
पांडुरंग ओळलासे । **राम** तेजे देखिला ।।१।।

## ३२. श्रीहरितात्या

आरती हरितात्या । जय जया सर्वेशा ।
साधन बहु केले । पावला परमेशा ।।ध्रु।।
दिगंत कीर्ती तुझी । काय बोलू मी वाणी ।
**दासराम** वंदितसे । दोन्ही जोडूनिया पाणी ।।१।।

# १२. राजकारणातील महनीय पुरूष

## १. श्रीशिवाजीमहाराज

क्षत्रिय-कुलावतंसा जय जय शिवराया ।
आरती ओवाळितो वंदुनी तव पाया ।
गोब्राह्मण-प्रतिपाळा छत्रपती सदया ।
समर्थ श्रीतुकयाची तुम्हावरी छाया ।।१।।
जयदेव जयदेव जय जय शिवराया ।
प्रेमे आरती करिता पुलकित ही काया ।।ध्रु।।
सर्व मराठा तितुका कैचा मेळविला ।
महाराष्ट्रा जागवुनी धर्म उभा केला ।
भगवा झेंडा गगनी फडफड फडकविला ।
रामराम भेटीचा संकेतची घडला ।।२।।
समर्थ चरणी तन मन राज्यही अर्पियले ।
ऐसे नाही कोठे आजवरी घडले ।
मातेसम पर नारी कवतुक दावियले ।
विश्वबंधुभावे विश्ववंद्य ठरले ।।३।।
रामराज्य हे कैसे भूवरी प्रगटविले ।
अष्टप्रधान नेमुनी लोकराज्य केले ।
व्यवहारी परमार्थी सुराज्य नांदविले ।
शिवराया तव चरणी **दासराम** लोळे ।।४।।

## २. महात्मा गांधी (राष्ट्रपिता)

आरती महात्माजी । सर्व जन तुम्हा राजी ।
अवतार तुमचा हा झाला । धन्य धन्य[१] झाला राजी ।।१।।
साधुराज देवकृपे । तुम्ही श्रीमंत जहाला ।
**दासराम** शरण आला । जगी जहाला मोकळा ।।२।।

## ३. श्री. लालबहादुर शास्त्री (भारताचे पंतप्रधान)

धन्य धन्य तव शास्त्री । सर्व जगाशी मैत्री ।
अवतार तुमचा हा । धन्य झाली धरित्री ।।१।।
धन्य धन्य वाटतसे । तुझी झाली कीर्ती ।
**दासराम** शरण येता । जेणे होय तुमची कीर्ती ।।२।।

***

१. पाठभेद - धन्य तुम्ही देवकाजी ।

# १३. पूज्य ग्रंथ

## १. श्रीभगवद्गीता

आरती जय गीते । रणी पार्थानिमित्ते ।
श्रीकृष्ण वच स्तविते । जय गंगे अमृते ।।ध्रु.।।
गोविंद वच धैर्य । उठवी जयिष्णुवीर्य ।
सांगुनी राजगुह्य । नाम गीतानुपम्य ।।१।।
हनुमंत राम सेवा । ध्वज रथासी भगवा ।
सारथी देव व्हावा । भाग्य अगाध पांडवा ।।२।।
आदित्य रश्मि स्वर्ण । कोटी कोटी दिपून ।
विश्वरूप होई दर्शन । भक्तीबळे निधान ।।३।।
गांडीव टणत्कार । धर्म रक्षी संहार ।
करवित शारंगधर । अंतर्बाह्य विचार ।।४।।
चिरंजीव दासा स्फुरिते । **राम** पदाब्जी रमते ।
गोविंद प्रेम गीते । गुरुलिंगा नमस्ते ।।५।।

## २. श्रीज्ञानेश्वरी/ज्ञानदेवी

### (१)

आरती ज्ञानेश्वरी । जे का ज्ञान ईश्वरी ।
अंतरी हेलावली । स्वानंदाची लहरी ।।ध्रु।।
सम्राट ज्ञानियांचा । महाराजा ज्ञानेश्वर ।
भावार्थ बोधियेला । परम गीता तत्त्वसार ।।१।।
ऐश्वर्य योग दावी । अर्जुनासी श्रीहरी ।
**दासराम** चिंतीतसे । भीतरिया अक्षरी ।।२।।

(२)

आरती ज्ञानदेवी । ज्ञानेश्वरी गूज दावी ।
भावार्थ दीपिका तू । ज्ञानेश्वर कृपे ठावी ।।ध्रु।।
अक्षरे चैतन्याची । गीता गीत अनुवाद ।
अर्जुनाचे कर्णपुटी । तत्त्व निनादे गोविंद ।।१।।
हृदया हृदय मेळविले । ज्ञानराजे ऐक्य केले ।
संतांची अनुभव गोठी । **दासराम** पायी लोळे ।।२।।

## २. हरिपाठ (श्रीज्ञानेश्वरमहाराजकृत)

(१)

भगवद्गीतादेवी ऐसा हरिपाठ ।
श्रीज्ञानेश्वर विष्णु दावी निघोट ।
कर्म उपासना ज्ञान चोखट ।
नित्य नेमे पढता पावे वैकुंठ ।।१।।
जय देव जय देव जय श्रीहरिपाठा ।
ओवाळू आरती प्रेमे मूळपीठा ।।ध्रु।।
समाधी संजीवन सहजे उत्कट ।
अखंड हरिपाठ होय घडघडाट ।
चिम्मड महाराजे ऐकियला स्पष्ट ।
श्रीहनुमंतप्रभूनी केला बोभाट ।।२।।
(भामनाथगिरी या श्रीतुकया श्रेष्ठ ।
लक्ष आवर्तन करी हरिपाठ ।
नामामृत गोडी आवडी अवीट ।

मुक्तीमंदिर शोभे[1] भक्तीचा मुगुट ।
इंद्रायणी लहरी लहरती हरिपाठ ।
दया क्षमा शांती तेचि वाळुवंट ।
नामे नाचती वैष्णव हरिकीर्तन भाट ।
प्रेमे ज्ञानराजा नामी संतुष्ट ।)
देवाचिये द्वारी उभा जरी नीट ।
ओलांगिल्या मुक्ती चारी घनवट ।
हरिपाठाचे हे सारची[2] एकवट ।
**गोविंदसुत राम** अंतरीया निकट ।।३।।

**(२)**

प्राकृत गीता देवी ऐसा हरिपाठ ।
भाविक भक्ता दावी ज्ञानाई वाट ।
प्रेमे नित्यचि पढता सहजे वैकुंठ ।
भागवत धर्माची उपासना नीट ।।१।।
माऊलीचिया रुपा जय जय हरिपाठा ।
आरती ओवाळू माऊली श्रेष्ठा[3] ।।ध्रु।।
समाधी संजीवन सहजे उत्कट ।
अखंड हरिपाठ होय घडघडाट ।
चिम्मड महाराजांनी ऐकियला स्पष्ट ।
माऊलीचे लडिवाळ शब्दची चोखट ।।२।।
(हरिमुखे म्हणा हरिमुखे म्हणा ।
कोण करील मग पुण्याची गणना ।

१. पाठभेद-मंगल २. पाठभेद-सूत्रची ३. पाठभेद-ओवाळू आरती आळंदी पीठा ।

इंद्रायणी लहरी उठताती नाना ।
साद प्रतिसाद वैष्णव भक्तजना ।)
होती[१] साधुसंत सज्जन वरिष्ठ ।
गाती ऐकती होऊनिया[२] भाट ।
ऐसे स्वरुप पाहुनी प्रेमे आकृष्ट ।
**गोविंदसुत रामा** गोडी अवीट ।।३।।

**(३)**

प्राकृत गीतादेवी ऐसा हरिपाठ ।
श्रीज्ञानेश्वर विष्णु दावी निघोट ।
कर्म भक्ती ज्ञान फलश्रुती अवीट ।
नित्य नेमे पढता भूवरी वैकुंठ ।।१।।
जयदेव जयदेव जय श्रीहरिपाठा ।
ओवाळु आरती अक्षर वैकुंठा ।।ध्रु।।
देवाचिया द्वारी[३] उभा जरी नीट ।
ओळंगिल्या मुक्ती चारी वरिष्ठ ।
हरिपाठी अवतरला श्रीरामपाठ ।
विस्फुरला गोविंदी **दासराम** विनट ।।२।।

**(४)**

अभंग अठ्ठावीस असती हरिपाठ । हरिमुखे म्हणा हे ध्रुपद वरी मुगुट ।
कर्म भक्ती ज्ञान फलश्रुती अविट । नित्यनेमे पढता भूवरी वैकुंठ ।।१।।
जयदेव जयदेव जय श्रीहरिपाठा । ओवाळू आरती आळंदीपीठा ।।ध्रु.।।

---

१. पाठभेद - साधुसंत सज्जन होऊनिया भाट ।
२. पाठभेद - करिती कीर्तन सेवा केवी चोखट ।
३. पाठभेद-साक्षात्काराचे या मानकरी श्रेष्ठ । गोविंदची ठरले माऊलीचे निकट ।
रेखांकित हे प्रतिमा देव्हारी नीट । स्थापियली तवचरणी दासराम विनट।२।

समाधी संजीवन सहजे उत्कट । अखंड हरिपाठ घुमे घडघडाट ।
चिमडमहाराजे ऐकियेला स्पष्ट । श्रीहनुमत्प्रभुनी केला बोभाट ।।२।।
देवाचिया द्वारी उभा जरी नीट । ओळंगिल्या मुक्ती चारी वरिष्ठ ।
श्रीज्ञानेश्वर विष्णु विभु दावी वाट । **गोविंदसुत राम** हरिपाठी विनट ।।३।।

(५)

प्राकृत गीतादेवी ऐसा हरिपाठ । श्रीज्ञानेश्वर विष्णु दावी निघोट ।
कर्म उपासना ज्ञान चोखट । नित्यनेमे पढता भूवरी वैकुंठ ।।१।।
जयदेव जयदेव जय श्रीहरिपाठा । ओवाळू आरती आळंदीपीठा ।।ध्रु.।।
समाधी संजीवन सहजे उत्कट । अखंड हरिपाठ घुमे घडघडाट ।
चिमडमहाराजे ऐकियेला स्पष्ट । श्रीहनुमत्प्रभुनी केला बोभाट ।।२।।
देवाचिया द्वारी उभा जरी नीट । ओळंगिल्या मुक्ती चारी वरिष्ठ ।
हरिनाम संकीर्तन सूत्र हरिपाठ । **गोविंदसुत राम** हरिपाठी विनट ।।३।।

## ३. सोपानदेवी (सोपानदेवकृत)

(१)

सोपानानी लिहिली सोपानदेवी ।
भगवत्गीता श्लोकावरी असे ओवी ।
ओवीवृत्त जयांचे भक्तीभाव ओवी ।
गुरुकृपे विवरीता मोक्षश्री पदवी ।।१।।
आरती ओवाळू सोपानदेवी ।
प्राकृत गीता म्हणुनी या जगती मिरवी ।।ध्रु।।
कर्म भक्ती[१] ज्ञान ऐसा सोपान ।
दावितसे या ग्रंथी स्वयेची सोपान ।

१. पाठभेद - जेणे योगे आकळे तशी ज्ञानदेवी । ऐसी हे गुरुकिल्ली दिसते शांभवी ।
कर्म ज्ञान भक्ती दर्शन माधवी । **दासराम** वंदी श्रीगीतादेवी ।।२।।

ज्ञानेश्वरी उकली येणे ही खूण ।
**दासराम** चिंतीता ते होय समाधान ।।२।।

(२)

आरती सोपानदेवी । गीता प्राकृत बरवी ।
सातशे श्लोकावरी लिहिली । केली सात शत ओवी ।।१।।
नुसते ओवीवृत्त नव्हे । भक्तीभाव ओवी ।
गुरूकृपे विवरीता । लाभे समाधान जीवी ।।२।।
जेणे योगे आकळे । श्रेष्ठ ग्रंथ ज्ञानदेवी ।
**दासराम** प्रेमभरे । तये ठायी माथा ठेवी ।।३।।

## ४. एकनाथी भागवत

एकनाथी भागवत । भागवत धर्मग्रंथ ।
प्राण हा भागवता । पढलियाची मुक्त ।।१।।
जय जया भागवता । आरती ही समर्था ।
पंचप्राण ओवाळूनी । करू प्रगट नाथा ।।ध्रु।।
एकाकार होवोनिया । एकाकार टीका केली ।
पैठणी साकारली । ज्ञानराज माऊली ।।२।।
ज्ञानेश अवतार । जनार्दन एकनाथ ।
**दासराम** गजर करी । भानुदास एकनाथ ।।३।।

## ५. श्रीतुकाराममहाराजांचा नित्यपाठ (बारा अभंग)

(१)

आरती नित्यपाठा । जय जया वरिष्ठा ।
पंचप्राण ओवाळिता । भेटी होय वैकुंठा ।।ध्रु।।

तुकोपनिषद हे । स्वर्गीची स्वरगंगा ।
भूतली आणियेली । निंबरगी गुरूलिंगा ।।१।।
हनुमंतप्रभूंनी तो । पाठ गोविंदा कथिला ।
अखंड साधनात । त्रिकाळ हा चालिला ।।२।।
द्वादश अभंग हे । वेदशास्त्रांचे सार ।
**दासराम** कंठी धरी । संत गाती अपार ।।३।।

**(२)**

स्वर्गातुनी अमृत हे तुकयांनी दिधले ।
सद्भक्तासी भूतली समाधान झाले ।
साधुसंती चित्ती प्रीती साठविले ।
टाळ आणि कंथा पाहुनी मन रमले ।।१।।
जयदेव जयदेव जय नित्यपाठा ।
ओवाळू आरती अक्षर वैकुंठा ।।ध्रु।।
त्रिकाळ अभंगाचा घोष जरी जहाला ।
भक्ता भेटीन भक्ती भगवानचि वदला ।
गुरुलिंगजंगमरूपे तुकया अवतरला ।
सद्गुरू प्रसाद सेवुनी **दासराम** धाला ।।२।।

## ६. कैवल्य मनोबोधिनी (बाबूरावजी कोटणीसमहाराजकृत)

**(१)**

जय जया मनोबोधा । केले प्रगट ब्रह्मानंदा ।
समर्थे सिद्ध केले । सेविलिया मकरंदा ।।१।।
धन्य हनुमंत सद्गुरू । थोर कृपेचे सागरू ।
वोळले पुत्रावरी । बोधियेला हा विचारू ।।२।।

गुरूपुत्र रघुनाथ । हरिभक्ती जे निरत ।
गुरूपदी शोभिवंत । बोधी मुराले चित्त ।।३।।
गुरू प्रासादिक वाणी । कैवल्याची पदबोधिनी ।
कैवल्य मार्गदर्शी । मुमुक्षूसी मोक्षदानी ।।४।।
सेविलिया मनोबोध । भक्त जनासी आनंद ।
**गोविंदसुत राम** । पायी लीन मतीमंद ।।५।।

**(२)**

कैवल्याची तेजोराशी उजळली ।
अखिलची भक्तजनासी मार्गदर्शी झाली ।
श्रवणे मनने प्रगटची निगम सार वल्ली ।
नयन मनोहर मूर्ती अक्षरी प्रकाशली ।।१।।
जय देवी जय देवी कैवल्यपदबोधिनी ।
आरती ओवाळिता मन उन्मन स्मरणी ।।ध्रु।।
हनुमत् सद्गुरूकृपे रघुनाथा बोधू ।
तैसा रघुनाथे मज दिला बोधानंदू ।
**दासराम** हा शरणची झाला मतीमंदू ।
समर्थ गुरूचरणाचा तयालागी छंदू ।।२।।

## ७. श्रीरामपाठ (श्रीमामामहाराज केळकरकृत)

**(१)**

रामपाठी हा हरिपाठ अवतार ।
रामपाठ स्वरूपी रामचि हा साकार ।
रामपाठ जागृती करील परपार ।
रामपाठ साऱ्या जीवा आधार ।।१।।
जय देव जय देव जय रामपाठा ।
ओवाळू आरती रामनाम पीठा ।।ध्रु।।

ज्ञानेश्वर प्रसादे गोविंदा स्फुरण ।
श्रीहनुमंतकृपेने कथिले विज्ञान ।
रेवणसिद्ध दर्शन होता परिपूर्ण ।
**दासराम** गाता नित्य समाधान ।।२।।

**(२)**

रामपाठ तो हा हरिपाठ सार ।
गोविंदा स्फुरला अक्षरी आकार ।
ज्ञानेश्वरकृपे घडला अवतार ।
गोपालनाथे[१] गाता राम साकार[२] ।।१।।
जय देव जय देव जय श्रीरामपाठा[३] ।
ओवाळू आरती कैवल्यपीठा ।।ध्रु।।
हनुमंत[४] विज्ञान दावी अरूवार ।
श्रीरेवणसिद्ध[५] जहाले गोचर ।
नित्य[६] नेमे पढती भाविक अपार ।
**दासराम**[७] पठणी पावे परपार ।।२।।

**(३)**

सोळा बारा चार मिळुनी बत्तीस ।
अभंग रामपाठ करी सावकाश ।
जेणे योगे चित्ती जोडे अविनाश ।
येथे उचंबळला शांताद्भुत रस ।।१।।
जयदेव जयदेव श्रीरामपाठा ।
आरती ओवाळू कैवल्यपीठा ।।ध्रु।।

---

१. पाठभेद - गोपालनाथा पुढती राम साकार । २. पाठभेद - चापधर
३. पाठभेद - चिन्मयपीठा ४. पाठभेद - वायुसुत
५. पाठभेद - श्रीरेवण गोविंदी ठेवी वरद कर ।
६. पाठभेद - भक्तीभावे भाविक पढती अपार ।
७. पाठभेद - **गोविंदसुत रामी** पठणी परपार ।

हनुमत् सद्‌गुरूकृपे ज्ञान फळा आले ।
ज्ञानेश्वरप्रसादे गोविंदे रचिले ।
रेवणसिद्ध प्रभूंनी दर्शन ज्या दिधले ।
अखंड रामपाठे रामरुप झाले ।।२।।
जैसा ज्ञानोबांचा असे हरिपाठ ।
तैसाचि तुकयाचा पहा नित्यपाठ ।
हरिपाठी अवतरला श्रीरामपाठ ।
**गोविंदसुत रामा** गाता वैकुंठ ।।३।।

**(४)**

आरती रामपाठा । रामस्वरूप श्रेष्ठा ।
अक्षरी आकारिला । धन्य अयोध्यापीठा ।।ध्रु।।
पवनारूढ राम । हनुमंते दाविला ।
स्वानुभव गोविंदाचा । पवन हा साधिला ।।१।।
अभंग बत्तीस हे । गोविंदराये रचिले ।
ज्ञानेशप्रसाद हा । रेवणसिद्ध भेटले ।।२।।
रामपाठ नेमे पढता । राम भेटे आपण ।
साधु संत नित्य गाती । **दासराम** धरी चरण ।।३।।

**(५)**

रामपाठ तो हा हरिपाठ सार । गोविंदा स्फुरला अक्षरी आकार ।
ज्ञानेश्वरकृपे घडला अवतार । गोपालनाथे गाता प्रगटे चापधर ।।१।।
जयदेव जयदेव जय श्रीरामपाठा । ओवाळू आरती चिन्मयपीठा ।।ध्रु.।।
वायुसुत विज्ञान दावी अरूवार । श्रीरेवण गोविंद ठेवी वरद कर ।
भक्तीभावे भाविक पढती अपार । **गोविंदसुत राम** पठणी परपार ।।२।।

***

## श्रीदासराममहाराजांच्या गुरूपरंपरेला वंदन

भगवान सोमेश । जगाचे या ईश ।
तदनु रेवणसिद्धेश । तयांना नमस्कार ।।१।।
महाराज रेवणसिद्ध । शिष्य त्यांचे मरुळसिद्ध ।
तयांचे शिष्य काडसिद्ध । वंदन तयांना करितसे ।।२।।
श्रीनारायण नाम । ते श्रीगुरूलिंगजंगम ।
रघुनाथप्रिय साधु परम । तयांना नमन ।।३।।
रामाचे अवतारू । चिमडाचे रामचंद्रू ।
मग हनुमंत गुरू । तयालागी प्रणाम ।।४।।
हनुमंतशिष्य प्रसिद्ध । दासराम ते संतसिद्ध ।
गुरू-शिष्य परंपरा वंद्य । पूजनीय ती **केशवा** ।।५।।

प्रा.डॉ.के.वा.आपटे

## श्रीदासराममहाराजांची आरती

आरती रामराया । करी कृपेची छाया ।
दावोनी दीनी दया । धन्य धन्य महाराया ।।ध्रु।।
सद्‌गुरू हनुमंत । पिता गोविंद संत ।
बोधी गुरुलिंग सिद्ध । धरुनि रूप सिद्धानंद ।।१।।
सिद्धसाधनाने । स्वये ब्रह्मचि झाले ।
भावादरे **केशवाने** । चरणी मस्तक ठेविले ।।२।।

प्रा.डॉ.के.वा.आपटे

## आरती संग्रहाची आरती

दासराम झाले थोर सत्पुरूष ।
त्यांच्या नामघोषे साधका हरूष ।
सांडुनिया इतरांचा द्वेष नी मत्सर ।
दादांनी रचल्या आरत्या अरूवार ।।१।।
जयदेव जयदेव जय आरती संग्रहा ।
करितो आरती होतो उल्हास अहा ।।ध्रु।।
भारत भूमीमाजी विभूती महान ।
प्रासादिक ग्रंथांचे तैसे महिमान ।
त्यातील आरत्या काहींच्या गाईल्या येथ ।
केशवा आरतीसंग्रह वाटे प्रशस्त ।।२।।
प्रा.डॉ.के.वा.आपटे

***

## प.पू.सद्गुरू श्रीचंद्रशेखर रामराय केळकर तथा श्रीअण्णामहाराज यांची आरती

आरती गुरुवर्या । श्रीअण्णा नाम तया ।
अखंड कीर्तनासी । समर्पिली मन काया ।।ध्रु।।
पिता तेचि सद्गुरू । श्रीदासराम थोरू ।
सीता माता चित्‌शक्ती । शुद्ध प्रेमाचा सागरू ।।१।।
'जयदेवा' विनयाने । साऱ्या जगासी जिंकीले ।
मुक्तहास्य दर्शनाने । भक्त सुखात न्हाले ।।२।।
दासरामवचनांचे । आम्हा दिले नवनीत ।
दादांचे लेकरू हे । भक्तीभावे नमीत ।।३।।

प्रसन्न गोखले

****

आरती चंद्रशेखरा । रामराय सुपुत्रा ।।
सोडवी भवबंधना । गुरुराया गुरुपुत्रा ।।ध्रु।।
अगाध रामप्रेम । प्रेममय नित्यनेम ।
गोविंद राम धाम । नाम त्रिवेणी संगम ।।१।।
देव कीर्तनासी येती । साधु संत वाखाणती ।
ब्रह्मतनु कीर्तनमूर्ती । आत्मानंदे डोलती ।।२।।
अखंड निदिध्यास । नामसंकीर्तन श्वास ।
लोळण पायावरी । घेतो राघवदास ।।३।।

सारंग कुलकर्णी

****

## सूची


| अ.क्र. | नांव | पृष्ठ.क्र. |
|---|---|---|
| ०१. | अक्कलकोट स्वामी ... ... ... | ५५ |
| ०२. | अडाणेश्वरमहाराज (अमरावती) ... ... | ५५ |
| ०३. | अण्णाबुवा ... ... ... ... | ४० |
| ०४. | अमलानंद स्वामी (पेण) ... ... ... | ५५ |
| ०५. | अंबुरावमहाराज ... ... ... ... | ३५ |
| ०६. | इंदिराबाई केळकर (श्रीरामरायांची माता) ... | २३ |
| ०७. | एकनाथमहाराज ... ... ... ... | ५० |
| ०८. | एकनाथी भागवत ... ... ... ... | ७४ |
| ०९. | कमलाकर वालावलकर (दिगंबरदासमहाराजांचे शिष्य) | ५६ |
| १०. | काकासाहेब तुळपुळे (सांगली) ... ... | ३७ |
| ११. | काडसिद्ध ... ... ... ... | ०७ |
| १२. | कार्तिकस्वामी (पंचायतन) (कोल्हापूर) ... | ५६ |
| १३. | कान्होपात्रा ... ... ... ... | ४८ |
| १४. | कृष्णाजीपंत ... ... ... ... | ५६ |
| १५. | कैवल्य मनोबोधिनी (बाबूरावजी कोटणीसमहाराज कृत) | ७५ |
| १६. | गजाननमहाराज ... ... ... ... | ५७ |
| १७. | गुरुसिद्धप्पामहाराज निंबरगीकर ... ... | १३ |
| १८. | गुलाबरावमहाराज ... ... ... ... | ५७ |
| १९. | गुंडुबुवा (बुधगांव) ... ... ... | ४१ |
| २०. | गोरा कुंभार ... ... ... ... | ४९ |
| २१. | गोविंदपंत घोसरवाडकर ... ... ... | २१ |
| २२. | गोविंदबुवा (तासगांव) ... ... ... | ५७ |
| २३. | गोविंदमहाराज वाटेगावकर ... ... ... | ४६ |
| २४. | गंगाधरसिंग दीक्षित (सांगली) ... ... | ३८ |
| २५. | चिद्सूर्य ... ... ... ... | ०२ |
| २६. | चिमड संप्रदाय ... ... ... ... | १८ |

| | | |
|---|---|---|
| २७. | जनार्दनस्वामी (एकनाथमहाराजांचे गुरू) ... | ५८ |
| २८. | जयरामस्वामी वडगावकर ... ... ... | ५८ |
| २९. | जलाराममहाराज (सौराष्ट्र) ... ... ... | ५८ |
| ३०. | तुकाराममहाराज ... ... ... ... | ५२ |
| ३१. | तुकाराममहाराजांचा नित्यपाठ (१२ अभंग) ... | ७४ |
| ३२. | तेलीमहाराज (शिरोळ) ... ... ... | ५८ |
| ३३. | त्रैमूर्ती ... ... ... ... ... | १७ |
| ३४. | दिगंबरदासमहाराज (पुणे) ... ... ... | ५९ |
| ३५. | देवी ... ... ... ... | ०३ |
| ३६. | धुंडिराज विनोद (पुणे) ... ... ... | ५९ |
| ३७. | धोंडीबाबा (पलूस) ... ... ... | ४२ |
| ३८. | धोंडीराममहाराज (इस्लामपूर).. ... ... | ४२ |
| ३९. | नागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर ... ... | १२ |
| ४०. | नामदेवमहाराज ... ... ... | ४८ |
| ४१. | नारायणमहाराज मळणगावकर (सांगली) ... | ४३ |
| ४२. | नारायणराव भाऊसाहेब निंबरगीकरमहाराज ... | १० |
| ४३. | निवृत्तीनाथमहाराज ... ... ... | ४७ |
| ४४. | नीलकंठ भारती (विठ्ठलवाडी)... ... ... | ६० |
| ४५. | पंतमहाराज बाळेकुंद्रीकर ... ... ... | ६० |
| ४६. | पांडुरंगमहाराज ताम्हनकर ... ... ... | ४४ |
| ४७. | बहिणाबाई (तुकाराममहाराजांच्या शिष्या) ... | ५३ |
| ४८. | बाळूमामा (आदमापूर) ... ... ... | ६१ |
| ४९. | भगवद्‌गीता ... ... ... ... | ६९ |
| ५०. | भाऊसाहेबमहाराज उमदीकर... ... ... | ३४ |
| ५१. | मनामाता (कनकेश्वर) ... ... ... | ६१ |
| ५२. | मरूळसिद्ध ... ... ... ... | ०६ |
| ५३. | महात्मा गांधी (राष्टपिता) ... ... ... | ६८ |
| ५४. | महादबामहाराज पाटील (नरसोबावाडी) ... | ६१ |
| ५५. | माईसाहेबमहाराज यरगट्टीकर... ... ... | २० |

| | | |
|---|---|---|
| ५६. | मामामहाराज केळकर (रामरायांचे पिताजी) ... | २४ |
| ५७. | मामासाहेब देशपांडे (पुणे) ... ... ... | ६२ |
| ५८. | रघुनाथप्रियसाधु/साधुराय/साधुराज ... ... | १४ |
| ५९. | रघुनाथ हणमंत कोटणीसमहाराज ... ... | १६ |
| ६०. | रवळनाथ ... ... ... ... | २२ |
| ६१. | राधाबाईअक्का गद्रे (हरिपूर) ... ... ... | ३८ |
| ६२. | रामचंद्रमहाराज यरगट्टीकर (चिमडमहाराज) ... | १५ |
| ६३. | रामदास समर्थ स्वामी ... ... ... | ३२ |
| ६४. | रामपाठ (मामामहाराज केळकरकृत) ... ... | ७६ |
| ६५. | राम मारुती (कल्याण) ... ... ... | ६३ |
| ६६. | रामरावमहाराज तिकोटेकर ... ... ... | ३७ |
| ६७. | रामेश्वर सोमेश्वर ... ... ... ... | २२ |
| ६८. | रेवणसिद्ध ... ... ... ... | ०४ |
| ६९. | लक्ष्मण दीक्षित (सांगली) ... ... ... | ३८ |
| ७०. | लक्ष्मीबाई अक्का ... ... ... ... | १९ |
| ७१. | लालबहाद्दूर शास्त्री (भारताचे पंतप्रधान) ... | ६८ |
| ७२. | वजीरबाबा (औरवाड) ... ... ... | ६३ |
| ७३. | वर्धमान महावीर (जैनधर्म संस्थापक) ... | ६३ |
| ७४. | वामनमहाराज गुळवणी (पुणे) ... ... | ६४ |
| ७५. | वायुदेव ... ... ... ... | ०२ |
| ७६. | विवेकानंद स्वामी ... ... ... ... | ६५ |
| ७७. | विष्णुबुवा जोगमहाराज ... ... ... | ५३ |
| ७८. | वेणाबाई (मिरज) ... ... ... ... | ३२ |
| ७९. | व्यासमुनी ... ... ... ... | ६५ |
| ८०. | शाळा नं.२ (सांगली नगरपालिका) ... ... | ३९ |
| ८१. | शिवरामबुवा ब्रह्मचारी ... ... ... | २० |
| ८२. | शिवलिंगव्वा (जत) ... ... ... | ३६ |
| ८३. | शिवाजीमहाराज ... ... ... ... | ६७ |
| ८४. | शंकरमामा शिपूरकर ... ... ... | २१ |

| | | |
|---|---|---|
| ८५. | शंकराचार्य (आद्य जगद्‍गुरू)... ... ... | ६६ |
| ८६. | श्रीधरस्वामी ... ... ... ... | ३३ |
| ८७. | सदानंदमहाराज (मुक्तानंदांचे शिष्य) ... ... | ६६ |
| ८८. | सद्गुरू ... ... ... ... ... | ०१ |
| ८९. | सन्नती चंदला परमेश्वरी ... ... ... | ०३ |
| ९०. | सावता माळी ... ... ... ... | ५० |
| ९१. | सूरदास ... ... ... ... ... | ६६ |
| ९२. | सेनामहाराज ... ... ... ... | ५० |
| ९३. | सोनोपंत ऊर्फ शं. वा. दांडेकर ... ... | ५३ |
| ९४. | सोपानदेव ... ... ... ... | ४८ |
| ९५. | सोपानदेवी (सोपानदेवकृत) ... ... ... | ७३ |
| ९६. | सोऽहं देव ... ... ... ... | ०१ |
| ९७. | हणमंत पांडुरंग कोटणीस (तात्यासाहेबमहाराज) | १६ |
| ९८. | हनुमंत ... ... ... ... | ०२ |
| ९९. | हरितात्या ... ... ... ... | ६६ |
| १००. | हरिपाठ (ज्ञानेश्वरमहाराजकृत)... ... ... | ७० |
| १०१. | हालसिद्ध ... ... ... ... | ०८ |
| १०२. | ज्ञाननाथ/ज्ञानदेव/ज्ञानेश्वरमहाराज ... ... | ४७ |
| १०३. | ज्ञानेश्वर चित्र (मामामहाराज केळकरांनी रेखाटलेले) | ३९ |
| १०४. | ज्ञानेश्वरी/ज्ञानदेवी ... ... ... | ६९ |

## साधकोपयोगी ग्रंथ

(खालील यादीतील ग्रंथ हे श्रीदासराम ग्रंथमाला पुष्पयादी व्यतिरिक्त आहेत.)

१. श्रीहनुमद्-गुरू-चरित्र-बोध-सार (श्रीमामामहाराज केळकर लिखित श्रीकोटणीसमहाराजांचे चरित्र)
२. श्रीगोविंद चरित मानस (प.पू.श्रीमामामहाराजांचे ओवीबद्ध चरित्र)
३. श्रवणी पाजुनी अमृतवाणी (प.पू.मामामहाराजांचे निवडक अभंगांचे विवरण)
४. नित्य नवा दिस जागृतीचा (श्रीदादांच्या ३६५ वचनांचे चिंतन)
५. श्रीहनुमत् गुरूचरित्र (न.दा.दिवेकर कृत श्रीकोटणीसमहाराजांचे ओवीबद्ध चरित्र)
६. श्रीदासरामगाथा (अभंग गाथा)
७. संजीवन पाठ (श्रीदासराममहाराज यांचे अभंग अर्थासह)
८. श्रीदासराममहाराजकृत आरती संग्रह
९. श्रीनित्यपाठांमृत (श्रीदादांची नित्यपाठावरील कीर्तने)
१०. साधन संध्या (श्रीरामनिकेतन येथील नित्यक्रम)
११. चिन्मय नित्यपाठ (श्रीरामनिकेतन येथील नित्यक्रम)
१२. अमृतवाणी (प.पू.श्रीमामामहाराज केळकर यांचा अभंग गाथा)
१३. सन्मार्ग दीप (चिमड मठ प्रकाशित)
१४. श्रीनारायणीय शिष्यप्रबोध अथवा भारतीय आत्मविद्या (प.पू.श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांची कीर्तने)
१५. श्रीगुरुलिंग गीतम् (प्रा.डॉ.के.वा. आपटे लिखित)
१६. श्रीदासराम गीतम् (प्रा.डॉ.के.वा. आपटे लिखित)
१७. श्रीदासराम वचनामृत (श्रीदादांची वचने)

| श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा | |
|---|---|
| क्रमांक | ग्रंथाचे नांव |
| १ | **नासदीय सूक्तावरील ओविबद्ध टीका** |
| २ | **श्रीदासरामगाथा** (अभंग गाथा) |
| ३ | **श्रीरामदासबोध** (ओवीबद्ध) |
| ४ | **संजीवन पाठ** (श्रीदासराममहाराज यांचे अभंग अर्थासह) |
| ५ | **श्रीचांगदेव पासष्टी एक नाम कला** (ओवीबद्ध टीका) |
| ६ | **श्रीदासराममहाराजकृत आरती संग्रह** |
| ७ | **ग्रंथत्रयी (**आत्मबोधप्रत्ययामृत, दासराम विंशिका व पंचविशी) |
| ८ | **श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग** |
| ९ | **श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन** |
| १० | **श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह** (३६५ वचने) |
| ११ | **श्रीगुरुमहिमा** |
| १२ | **श्रीदासरामगाथा पुरवणी** |
| १३ | **श्रीदासराममहाराज आत्मचरित्र** |
| १४ | **श्रीदासराममहाराज कृत श्लोकरचना** |
| १५ | **श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव** (श्रीदासरामकृत समओवी टीकेसह) |
| १६ | **रामदासस्वामीकृत आत्माराम** (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) |
| १७ | **श्रीगुरुलिंगगीता** (२२८ पदे) |
| १८ | **श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता** (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) |
| १९ | **श्रीदासराममहाराज लिखित लघु संतचरित्रे** |
| २० | **श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र** (श्रीदासरामलिखित) |
| २१ | **श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी** |
| २२ | **श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन** |
| २३ | **श्रीदासराममहाराज यांची प्रवचने** (१०८) |
| २४ | **समर्थ रामदासकृत करुणाष्टके** (श्रीदासराममहाराजकृत विवरणासह) |

| क्रमांक | ग्रंथाचे नांव |
| --- | --- |
| २५ | **श्रीगुरुलिंगगीता** (६६ पदे व अर्थ) |
| २६ | **श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध** (विवरणासह) |
| २७ | **ज्ञानेश्वरी ६वा अध्याय** (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह) |
| २८ | **श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग** (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह) |
| २९ | **श्रीएकनाथकृत आनंदानुभव** (श्रीदासरामकृत टीकेसह) |
| ३० | **परमार्थ प्रश्नोत्तरी** |
| ३१ | **श्रीदासराम चिंतनिका** (श्रीदासराममहाराज लिखित लेख संग्रह) |
| ३२ | **श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ**(श्रीदादांचे १६अभंगांचे विवरण) |
| ३३ | **अक्षरे चैतन्याची भाग-१** (ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) |
| ३४ | **अक्षरे चैतन्याची भाग-२** (ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) |
| ३५ | **ज्ञानगंगा** (श्रीदासराममहाराजांची प्रवचने) |
| ३६ | **अक्षरधारा** (श्रीदासराममहाराजांचे संकीर्ण लेखन) |
| ३७ | **श्रीरामपाठांमृत** (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने) |
| ३८ | **श्रीनित्यपाठांमृत** (श्रीदादांची नित्यपाठावरील कीर्तने) |
| ३९ | **श्रीबाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र** (श्रीदासराम लिखित) |

## श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प सूची

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| १ | चिमड संप्रदाय | २००५ |
| २ | श्रीरामदासस्वामी चरित्र | २००६ |
| ३ | श्रीदासराममहाराजप्रणित भजन तरंग | २००६ |
| ४ | श्रीदासराममहाराज कथित हरिपाठ संकीर्तन | २००७ |
| ५ | श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | २००७ |
| ६ | दासबोधातील तत्त्वज्ञान | २००७ |
| ७ | श्रीदासराममहाराजांचा वचन संग्रह | २००८ |
| ८ | श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | २००९ |
| ९ | साधन संध्या | २००९ |
| १० | अनंत अमृत स्मरण | २००९ |
| ११ | श्रीगुरुमहिमा | २००९ |
| १२ | श्रीज्ञानेश्वरी प्रसाद (श्रीज्ञानेश्वरीतील निवडक ओव्या अर्थासह) | २००९ |
| १३ | श्रीदासरामगाथा पुरवणी | २००९ |
| १४ | श्रीदासराममहाराज आत्मचरित्र | २०१० |
| १५ | श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर चरित्र | २०१० |
| १६ | श्रीदासराममहाराज श्लोकरचना | २०१० |
| १७ | श्रीज्ञानदेवकृत अमृतानुभव(श्रीदासरामकृत समओवी टीकेसह) | २०१० |
| १८ | श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्र | २०१० |
| १९ | रामदासस्वामीकृत आत्माराम(श्रीदासरामकृत गद्यार्थासह) | २०१० |
| २० | श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २०१० |
| २१ | श्रीगुरुलिंगगीता (मराठी) | २०१० |
| २२ | श्रीरामनिकेतन (माहिती पुस्तिका) | २०११ |
| २३ | श्रीरामनिकेतनमधील आराधना | २०११ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| २४ | **ग्रंथत्रयी**(आत्मबोधप्रत्ययामृत,श्रीदासरामविंशिका, श्रीदासरामपंचविंशी) | २०११ |
| २५ | **श्रीज्ञानदेवकृत उत्तरगीता** (श्रीदासरामकृत गद्यार्थासह) | २०११ |
| २६ | **अभंगदरबार (आवृत्ती १)** | २०११ |
| २७ | **सद्बोध दशक** (श्रीदादांच्या १० अभंगांवरील विवरण) | २०११ |
| २८ | **श्रीदासराममहाराज नित्यपाठचरित्र** | २०११ |
| २९ | **श्रीगुरुराजकथित ज्ञान आणि बोध** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०११ |
| ३० | **प.पू.श्रीमाईसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०११ |
| ३१ | **पाठांतर सुलभ भगवत्गीता** | २०११ |
| ३२ | **श्रीदासराममहाराज लिखित लघु चरित्रे** | २०११ |
| ३३ | **श्रीतात्यासाहेबमहाराजकृत मनोबोध** (निवडक अभंग विवरणासह) | २०११ |
| ३४ | **प.पू.श्रीरामभाऊमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०११ |
| ३५ | **महायोगिनी श्रीलक्ष्मीबाईअक्का चरित्र** | २०११ |
| ३६ | **तो हा दासबोध** (दासबोधातील सारभूत ओव्या अर्थासह) | २०११ |
| ३७ | **श्रीदासराममहाराज चरितामृत** | २०११ |
| ३८ | **श्रीनिंबरगीकरमहाराज चरित्र** | २०११ |
| ३९ | **श्रीदाजीसाहेबमहाराज यरगट्टीकर चरित्र** | २०११ |
| ४० | **श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस चरित्र** (श्रीदासरामलिखित) | २०११ |
| ४१ | **श्रीदासराममहाराज यांची आत्मलहरी** | २०११ |
| ४२ | **श्रीदासराममहाराजकृत हरिनामसंकीर्तन** | २०१२ |
| ४३ | **श्रीदासराममहाराज यांची प्रवचने** (१०८) | २०१२ |
| ४४ | **प.पू.श्रीमामामहाराज केळकर चरित्र** | २०१२ |
| ४५ | **श्रीदासरामगीतम्** (श्रीदादांचे संस्कृत चरित्र व संस्कृत रचना) | २०१२ |
| ४६ | **श्रीदासराममहाराज वचनसंग्रह** (३६५ वचने) | २०१२ |
| ४७ | **चैतन्यब्रह्म** | २०१३ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ४८ | **श्रीदासराममहाराजकृत वायुलहरी** (विवरणासह) | २०१३ |
| ४९ | **स.रामदासकृत करुणाष्टके** (श्रीदासराममहाराजकृत विवरणासह) | २०१३ |
| ५० | **श्रीगुरुलिंगगीता** (६६ पदे व अर्थ) | २०१३ |
| ५१ | **चिमड संप्रदायातील पंचपदी** (विवरणासह) | २०१३ |
| ५२ | **गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग -१** | २०१४ |
| ५३ | **श्रीदासराममहाराजकृत रामदासबोध** (विवरणासह) | २०१४ |
| ५४ | **श्रीदासरामायण** (श्रीदासराममहाराजांचे गीतचरित्र) | २०१४ |
| ५५ | **श्रीदासराममहाराज केळकर नामसाधना मंदिर वास्तुशांत** | २०१४ |
| ५६ | **श्रीदासराममहाराजकृत रेवणसिद्धपाठ** (विवरणासह) | २०१४ |
| ५७ | **गुरुलिंगगीतेचे अंतरंग भाग-२** | २०१५ |
| ५८ | **अभंग दरबार** (आवृत्ती २ री) | २०१५ |
| ५९ | **श्रीदासरामचरित्र** (ओवीबद्ध) | २०१५ |
| ६० | **आत्मारामपाठ** (श्रीदादांच्या २० अभंगांवरील विवरण) | २०१५ |
| ६१ | **ज्ञानेश्वरी ६वा अध्याय** (श्रीदासराममहाराजकृत गद्यार्थासह) | २०१५ |
| ६२ | **श्रीमद्‌दासबोधातील प्रपंचयोग** | २०१५ |
| ६३ | **अभंग दरबार भाग - २** | २०१५ |
| ६४ | **श्रीज्ञानदेवांचे निवडक अभंग** (श्रीदासराममहाराजकृत अर्थासह) | २०१६ |
| ६५ | **श्रीएकनाथकृत आनंदानुभव** (श्रीदासरामकृत टीकेसह) | २०१६ |
| ६६ | **नासदीयसूक्त विवरण** | २०१६ |
| ६७ | **श्रीज्ञानदेवतेहेत्तिशी भावार्थ विवरण** | २०१७ |
| ६८ | **पाठांतर सुलभ भगवद्‌गीता आवृत्ती दुसरी** | २०१९ |
| ६९ | **दासबोधातील परमार्थ योग** | २०१९ |
| ७० | **चांगदेवपासष्टी एक नामकळा** (विवरणासह) | २०१९ |
| ७१ | **परमार्थ प्रश्नोत्तरी** (पुनर्मुद्रण) | २०१९ |

| पुष्प क्रमांक | ग्रंथाचे नांव | सन |
|---|---|---|
| ७२ | **चिन्मयबोध** (गुरुपरंपरेतील सिद्धपुरुषांची पदे अर्थासह) | २०१९ |
| ७३ | **श्रीदासराम चिंतनिका** (लेख संग्रह) | २०१९ |
| ७४ | **श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ**(श्रीदादांचे १६अभंगांचे विवरण) | २०१९ |
| ७५ | **अक्षरे चैतन्याची भाग-१**(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) | २०२० |
| ७६ | **अक्षरे चैतन्याची भाग-२**(ज्ञानदेवांच्या वाङ्मयावरील लेखन) | २०२० |
| ७७ | **ज्ञानगंगा** (श्रीदासराममहाराजांची प्रवचने) | २०२० |
| ७८ | **अक्षरधारा** (श्रीदासराममहाराजांचे संकीर्ण लेखन) | २०२० |
| ७९ | **श्रीनिंबरगी संप्रदाय दर्शन** (सचित्र मार्गदर्शन पुस्तिका) | २०२० |
| ८० | **श्रीरामपाठांमृत** (श्रीदादांची रामपाठावरील कीर्तने) | २०२० |
| ८१ | **नित्यकीर्तनानंदा** | २०२० |
| ८२ | **चैतन्याचा महामेरू** (श्रीदादांचा जन्मशताब्दी गौरवग्रंथ) | २०२० |
| ८३ | **सांप्रदायबोध** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०२० |
| ८४ | **अभंग सुधा** (श्रीदादांच्या अभंगांवरील विवरण) | २०२० |
| ८५ | **श्रीदासरामचरित्र** (ओवीबद्ध) (दुसरी आवृत्ती) | २०२० |

# पहिल्या आवृत्तीचा पुरस्कार

**आशीर्वाद तया जाती । आवडी चित्ती देवाची ।।**
**-- श्रीतुकाराममहाराज**

आमचे ती.प.पू. श्रीदादामहाराज केळकर यांना अनेक देवदेवतांच्या, अनेक सिद्धसत्पुरूषांच्या ज्या आरत्या स्फुरल्या, त्यांचा ''आरती संग्रह'' आमचे श्रीदादांचे श्रेष्ठ भक्त श्री. कृ.रा. शिंगाडे हे प्रकाशित करीत आहेत. साऱ्या शिंगाडे कुटुंबाचीच आमच्या श्रीदादांचेवर व आमच्या मातोश्री ती.प.पू. सौ. सीतावहिनी यांचेवर अलौकिक श्रद्धा आहे. परमार्थात श्रद्धेला फार मोठे महत्व आहे. साताऱ्याजवळील अंबवडे-विठ्ठलवाडीचे श्रेष्ठ संत श्रीनीळकंठ भारतीमहाराज, श्री. शिंगाडे यांना 'रामाचे मारुती आहेत' (श्रीदादांचे मारुती) असे म्हणत असत. हा आरती संग्रह प्रकाशित करून अनेक भाविकांचेवर फार मोठे उपकार श्री. शिंगाडे यांनी केले आहेत.

या आरती संग्रहाचे प्रकाशनाचे कामी त्या आरत्या संकलित करणे, संपादित करणे असे फार मोठे काम आमच्या श्रीदादांच्या अंतरंगातील एक श्रेष्ठ साधक प्रा. डॉ. के. वा. आपटे यांनी केले आहे. याकामी त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. माया वहिनी व चिरंजीव श्री.नारायण आपटे यांचे फार मोठे सहकार्य त्यांना लाभले आहे. हे सारे जे घडले, घडत आहे, घडेल ते सारे श्रीदादांचेवरील आत्यंतिक श्रद्धेमुळे-निष्ठेमुळे, यात संदेह नाही.

सदरचा 'आरती संग्रह' श्री.कृ.रा.शिंगाडे यांनी त्यांच्या मातोश्री प.पू.कै. बाळकाबाई रामचंद्र शिंगाडे यांचे स्मरणार्थ प्रकाशित केला आहे. याला कारण त्यांची उत्कट मातृभक्ती हे होय. यामुळे या ग्रंथाला वेगळे महत्व आहे.

या आरती संग्रह ग्रंथास भगवान श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीकरमहाराज, भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस व आमचे आजोबा ती.

प.पू. श्रीमामामहाराज केळकर या त्रैमूर्तींचा आशीर्वाद प्राप्त व्हावा, अशी ती. प.पू. श्रीदादांचे चरणी नम्र प्रार्थना आहे.

''आरती केली की परती नाही'' म्हणजे ज्याला सद्गुरूंचा अनुग्रह प्राप्त झाला, त्याला साधन केले तर पुन्हा जन्म नाही, असे भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस कीर्तनात म्हणत असत. असे काही साधन आमचे हातून घडून याची अनुभूती माझेसह जे कोणी श्रीमहाराजांचे आहेत, त्या सर्वांना यावी, अशी प्रार्थना माझे पितृदेव ती.प.पू. श्रीदादामहाराज केळकर यांचे चरणी शतशः करून येथेच थांबतो. पुन्हा एकदा प्रा. डॉ. के. वा. आपटे, श्री.कृ.रा.शिंगाडे व या ग्रंथाचे मुद्रक श्री. सतीश लोखंडे यांना अनेक धन्यवाद!

सांगली. श्रीदादांचा कृपाभिलाषी

१४.०७.२००२ *चंद्रशेखर*

॥ श्रीस्वामीसमर्थ दासराम माऊली प्रसन्न ॥

# पहिल्या आवृत्तीच्या प्रकाशकाचे मनोगत.......

आमचे सद्गुरू भगवान् श्रीस्वामीसमर्थ दासराममाऊलींनी आपल्या प्रासादयुक्त वाणीने लिहिलेला, अमृतासही पैजे जिंकणारा, सर्व साधुसंत, संप्रदाय, सर्व धर्मांचे महात्मे, सर्व जातींचे सिद्धपुरुष यांच्यावर अनेक आरत्या वेळोवेळी प्रसंगानुसार करून ठेवल्या होत्या. त्या सर्व एकत्रित करून 'श्रीदासराममहाराजकृत आरती संग्रह' हा ग्रंथ संपादन करणेचे कार्य श्रीदादांचे प्रिय आणि माझे आदरणीय डॉ.के.वा.आपटे(सर) यांनी केले आहे. त्यांचे वय व प्रकृती हे पाहिले म्हणजे हे सर्व मोलाचे वाटते. हा आरती संग्रह प्रकाशित झाला तर ह्या कराल कलीकालात भाविकांना एक आधार होईल व त्यांचे भक्तीकार्यात नित्य नवा आविष्कार घडेल, असे माझे मनोगत मी श्री. आपटे सरांजवळ व प.पू.श्रीअण्णामहाराज केळकर यांचेजवळ प्रगट केले. डॉ. आपटेसर यांनी लगोलग श्रीदादांच्या निरनिराळ्या वह्यात विखरून असलेल्या जवळ जवळ ७० आरत्या लिहून काढल्या. माझ्याजवळही ७०-८० आरत्या होत्या. त्या एकत्र करून हा आरती संग्रह तयार झाला व तो प्रकाशित करण्याचे महद्भाग्य मला लाभले, ही माझ्या आयुष्यातील अलौकिक आणि मोलाची बाजू सद्गुरूकृपेनेच मला प्राप्त झाली,असे मी समजतो.

समर्थ सद्गुरू श्रीदासराममहाराजांच्याच्या आरती संग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे एकाच महात्म्याने जगातील अनेक धर्म, संप्रदाय, पंथ, जाती, देव, देवता यांच्या आरत्या केल्या हे आहे. हे एकमेव असे उदाहरण आहे. भूतकाळात असा ग्रंथ निर्माण झाला नाही, वर्तमान काळात नाही आणि भविष्यकाळात होणे शक्य नाही, असे म्हटले तर वावगे होणार नाही. संपूर्ण विश्वाशी तादात्म्य झाल्याशिवाय असे साहित्य निर्माण होणे शक्यच नाही असे मला वाटते. समर्थ सद्गुरू श्रीदासराममहाराज हे विश्वरूप असे महात्मे होते. हे 'विश्वचि माझे घर' अशी त्यांची सर्व काया, क्रिया, चालणे, बोलणे, पाहणे झाले होते. यासंदर्भात त्याचे आणखी एक उदाहरण देता येईल. त्यांचे एक शिष्य प्रा.डॉ.दा.वि.कुलकर्णी यांनी दादांचे आशीर्वादाने व आज्ञेने भगवान श्रीगुरुलिंगजंगममहाराजांच्या द्विशताब्दी निमित्त 'संतसहस्त्रनाम' नावाचा एक अलौकिक ग्रंथ संस्कृतमध्ये लिहिला. त्या त्या ठिकाणी, त्या त्या श्रद्धास्थानी या ग्रंथाचे अत्यंत श्रद्धेने पुष्प, आरती, प्रसाद अशा थाटाने संपूर्ण जगभर वाचन झाले. खरे म्हटले तर हा एक 'न भूतो न भविष्यति' असा सोहळा समर्थ सद्गुरूंनी या विश्वात घडविला. ही विश्वरूपाची महती विश्वरूपाशी एकरूप झालेले महात्मेच करू शकतात, असे नवनीत यातून निघते. असो.

श्रीसमर्थ सद्गुरू श्रीदासराममहाराजांचे, प्रचंड विश्वावरील अध्यात्मातील अलौकिक ऋण पाहिले म्हणजे मती गुंग होऊन जाते. 'पवित्र ते कुळ पावन तो देश । जेथे हरिचे दास जन्म घेती ॥' ही उक्ती यामागे येतेच. भारत हा ऋषी-मुनी-संतांचा, ईश्वराचे अवताराचा देश. महाराष्ट्र तर ज्ञानबा-तुकोबांचा अध्यात्म देश. अशा महाराष्ट्रात सुमारे ५०० वर्षांची अध्यात्माची परंपरा असलेल्या केळकर कुळात श्रीदासराममहाराजांचा अवतार झाला. त्यांच्या मातुल घरामध्ये, कुरुंदवाडी कृष्णानदीकाठी दत्तगुरूंचे वास्तव्याने पावन झालेल्या भूमीत, महाराजांचे पिता श्रीगोविंद ऊर्फ मामामहाराज व माता प.पू.इंदिरामाऊली यांच्या पोटी, भगवान ज्ञानेशमाऊलींचे आशीर्वादाने व विदेही अवलिया वजीरबाबा

(औरवाड क्षेत्र) यांनी भाकित केलेप्रमाणे, इ.स.१९२० साली ७ व्या महिन्यात त्यांचा अवतार झाला. त्याचवेळी भगवान समर्थ सद्‌गुरू श्रीतात्यासाहेब कोटणीसमहाराज कुरुंदवाड मुक्कामी आले होते. हा ईश्वरी संकेत आणि सूत्रच म्हटले पाहिजे. श्री.अनंतरावजींचे आमंत्रणावरून कोटणीसमहाराज इंदिराबाईंच्या मातुलगृही गेले. केवळ १४ दिवसांचे हे बाळ श्रीकोटणीसमहाराजांचे मांडीवर ठेवले गेले. स.स.कोटणीसमहाराजांनी त्या बाळाला आपले हाताने कुरवाळले व बाळ आमचाच आहे याचे नाव 'राम' ठेवा असे सांगून, त्याचेवर दृष्टी-स्पर्शाद्वारे पूर्ण कृपानुग्रह केला. (स.स.श्रीदासराममहाराज म्हणत, आजही तो स्पर्श मी विसरलो नाही.) त्याचवेळी श्रीकोटणीस सद्गुरूमाऊलींनी आशीर्वाद दिला की, हा बालवयातच कीर्तन करेल आणि तसेच झाले. श्रीदासराममहाराजांचे बालपणापासूनच सर्व काही अलौकिकच होते. ते ५ वर्षांचे झाल्यावर कीर्तन करू लागले. श्रीदासराममहाराज सांगली येथे आपल्या घरी श्रीरामनिकेतन या धामात कीर्तन करीत होते.

सन १९२४ साली भ.स. श्रीतात्यासाहेब कोटणीस सद्‌गुरूमाऊलींनी देह ठेवला. देह ठेवल्यानंतर, त्यांचे अखंड हरिनामसंकीर्तन त्यांचे पुत्र प.पू.श्रीसद्गुरू बाबूरावजी कोटणीसमहाराज यांनी चालू ठेवले. त्यानंतर श्रीसद्गुरू श्रीमामामहाराज केळकर हे जे श्रीतात्यासाहेबमहाराजांचेवर भक्ती करणारे होते व त्यांचे कीर्तनावर निष्ठा असणारे होते व त्यांचे अंतरंगातील भक्त होते, ते एकदा दासबोध ग्रंथाचे वाचन करीत असताना, त्यांचेपुढे श्रीतात्यासाहेबमहाराज प्रगट झाले व त्यांना अखंड कीर्तन करण्यास आशीर्वाद देऊन अदृश्य झाले. श्रीतात्यासाहेबांचे आज्ञेप्रमाणे श्रीमामामहाराजांनी सन १९६२ पर्यंत सतत ३८ वर्षे अखंड कीर्तन केले. ते प्रसिद्धी, लोभ, मानसन्मान या सर्व लौकिकांपासून सतत अलिप्त असत. अनेक संप्रदायांचे संतमहात्मे त्यांना एकनाथमहाराजांचा अवतार मानतात. अशा संतमहात्म्यांच्या सहवासात प.पू.श्रीसद्गुरू श्रीदासराममहाराजांचे संपूर्ण आयुष्य नाममय होऊन गेले. त्यांच्याकडे अनेक संतमहात्मे येत असत. स.स.श्रीदासराममहाराज वयाच्या ५व्या वर्षापासून कीर्तन करीत असत. श्रीसद्गुरू माऊलींनी अनेक पारमार्थिक ग्रंथ आपल्या वयाच्या ९व्या वर्षापासून लिहिले. 'रामदासबोध' हा ग्रंथ त्यांनी आपल्या वयाच्या ९व्या वर्षी लिहिला. 'ज्ञानदेवतेहेत्तीशी' या ग्रंथावर टीका तसेच इतर अनेक ग्रंथांवर टीका, असे त्यांचे अनेक ग्रंथ म्हणजे परमार्थात वाटचाल कणाऱ्यांना एक अमोल ठेवा आहे.

भगवान् श्रीगुरुलिंगजंगमस्वामीमहाराज म्हणजे श्रीदासराममहाराजांचे सर्वस्व. श्रीगुरुलिंगजंगम महाराजांनी प्रसन्न होऊन, आपला देह ठेवून ५३-५४ वर्षे झाल्यानंतरही, श्रीदासराममहाराजांच्यासाठी प्रगट होऊन, स्वतः त्यांचेशी संभाषण करून, तसेच नाद व प्रकाश या रुपाने, २२८ पदे त्यांना प्रसाद म्हणून दिली. भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला गीता सांगितली व पारमार्थिक रहस्ये सांगितली, तसाच हा भगवान गुरुलिंगजंगम स्वामीमहाराजांचा बोध आहे. अधिकारसंपन्न महात्मे हे 'गुरुलिंगगीता' म्हणजे जगातील सर्वश्रेष्ठ ग्रंथ व बोध मानतात. असो.

श्री.स.स.श्रीदासराममहाराजांनी अनेक पदे, काव्ये, संतांची चरित्रे तसेच अनेक ग्रंथांवर टीका लिहिल्या. सर्व धर्मांचे तत्त्वज्ञान, सर्व धर्मातील महात्मे श्रीदासराममहाराजांना अतिशय प्रिय होते. त्यांचा 'श्रीदासरामगाथा' हा १८७५ अभंग असलेला पारमार्थिक अभंगगाथा प्रसिद्ध झाला असून, त्यामध्ये हिंदू, बौद्ध, जैन, ख्रिश्चन, मुस्लिम, लिंगायत, पारशी, शीख अशा अनेक महात्म्यांचा, तसेच त्यांच्या कार्याचा गौरव अभंगाद्वारे केला आहे. सर्व धर्माचे महात्मे महाराजांना किती प्रिय होते ते

श्रीदासरामगाथेतील अभंग क्र.११६४, ११६५ व ११६७ मध्ये दिसून येते. महाराज सर्व धर्मसंस्थापकांना परमेश्वराइतके प्रिय मानतात. सर्व संप्रदायातील महात्मे, महान साध्वी स्त्रिया, तसेच सर्व जातीधर्मातील संतमहात्म्यांचेवर महाराजांनी अनेक गौरवपर अभंग केले आहेत. ते पाहिले म्हणजे, श्रीज्ञानेश्वरमाऊली, श्रीतुकोबामाऊली यांच्या ग्रंथांशी या दासरामगाथेची तुलना होते.

सन १९७३ ते सन २००१ या कालावधीत मी सतत ३० वर्षे श्रीदासराममहाराजांचे चरणाजवळ होतो. त्यांचे दर्शन मी घेतले, त्यांचे पादसेवन केले आणि त्यांचा बोध, कीर्तन, प्रवचन ऐकले. अनेक साधू संतांचे भेटीचेवेळी महाराज मला घेऊन जात. प.पू.श्रीडोंगरेमहाराज, धारवाडचे कुमारस्वामीजी, सौराष्ट्रचे तपस्वी श्रीवालदासजीमहाराज, श्रीस्वामी चिन्मयानंदजी, श्रीमहादबामहाराज पाटील, श्रीनीलकंठ भारती महाराज, श्रीहरिकाका, आंध्रच्या साध्वी अम्मा मातोश्री, स्वामी अमलानंद, पूज्य कवीश्वरमहाराज, श्रीमामासाहेब देशपांडे, वाईच्या ताई दामले अशा अनेक महात्म्यांचे दर्शनाला महाराजांचेबरोबर जाण्याचा मला योग आला. त्या त्या ठिकाणी श्रीमहाराजांचा देवदुर्लभ भव्य स्वागत समारंभ पाहून मीही धन्य होत असे. श्रीसंत बाबामहाराज सातारकर, प्रा. श्री.शिवाजीराव भोसले, विद्यावाचस्पती श्री.क्षीरसागर वगैरे महान व्यक्ती महाराजांच्या भेटीस आल्या. त्यावेळी मला तेथे हजर राहण्याचा योग आला. त्यावेळच्या प्रसंगांचे वर्णन शब्दाच्या पलीकडचे आहे, एवढेच म्हणता येईल. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे देशातील महान, महान संतमहात्मे सांगलीत आले म्हणजे ते मुद्दाम महाराजांचे दर्शन घेऊन जात. त्यात सर्व धर्माचे महात्मे असत. महाराज सर्वांचा गौरव करीत. ते सर्व महात्मे आनंदी होत असत.

अक्कलकोटचे श्रीस्वामीसमर्थमहाराज यांच्या परंपरेतील श्रीबीडकरमहाराज, श्रीरावसाहेब सहस्त्रबुद्धेमहाराज, श्रीदिगंबरदासमहाराज यांचे परम अधिकारसंपन्न शिष्य, पुण्याचे श्रीअशोककाका जोशीमहाराज यांची श्रीदासराममहाराजांचेवर अतिशय निष्ठा असून, ते स्वामीसमर्थांचे इतके श्रीदासराममहाराजांना मानतात व म्हणतात, ''सांगलीत ब्रह्म अवतरले आहे. या महात्म्याला कोणी ओळखलेच नाही.'' डेरवण, अंधेरी, पुणे येथील मठातील सर्व भक्त श्रीदादामहाराजांचे दर्शनास नेहमी सांगलीत येत असतात.

भगवान श्रीगुरुलिंगजंगममहाराजांचेप्रमाणे श्रीदासराममहाराजांचे सर्व काही विशाल होते. सोने आणि माती, राव आणि रंक त्यांना सारखेच वाटत असत. दुःखीकष्टी, गोरगरीब, संसारतापाने पोळणारे या सर्वांना महाराज व त्यांच्या धर्मपत्नी प.पू.सौ.सीतामाई या आईपेक्षा, देवापेक्षा अधिक ममतेने जवळ करीत व लाभावीण प्रिती करून त्या जीवाला आपला म्हणत, धीर देत. याला एक, त्याला एक असा दुजाभाव कधी पाहण्यास मिळत नसे. एस.टी. स्टॅण्डवरील हमाल असो, नाही तर मंत्री, खासदार असो, महाराज दोघांवर सारखेच प्रेम करीत. 'भेदाभेद वैष्णवासी अमंगल' असे त्यांचे सर्व काही होते. प्रत्येकास वाटे, महाराजांचे आपल्यावरच प्रेम आहे, कृपा आहे, महाराज आपलेच आहेत.

मी सद्गुरू श्रीदासराममहाराजांचे जवळ बसत असे, त्यावेळी अनेक साधुसंत, महात्म्यांच्या आरत्यांच्या संदर्भात बोलत असे. तत्काळ महाराज त्यांच्या आरत्या करून मला देत. अशा अनेक आरत्यांचा संग्रह माझ्याकडे मी प्राणापेक्षा अधिक मोलाने जपून ठेवला होता. तसेच, श्रीदादामहाराजांनी केलेल्या अनेक आरत्या, श्रीदादांच्या निरनिराळ्या वह्यात लिहिलेल्या होत्या. या सर्व आरत्या संग्रहित करून एक ग्रंथ प्रकाशित करावा, अशी माझी इच्छा मी श्रीचंद्रशेखर अण्णा व डॉ. के.वा.आपटे

यांच्याजवळ बोलून दाखविली. ती त्यांना पसंत पडली आणि प.पू.कै.बाळकाबाई रामचंद्र शिंगाडे हिच्या स्मृतीप्रित्यर्थ हा 'आरती संग्रह' प्रकाशित करण्याची माझी इच्छा होती. माझ्या आईची प.पू.श्रीदादांचेवर आणि सौ. वहिनींचेवर अतिशय निष्ठा होती. तिला प.पू.श्रीदासराममहाराजांचा अनुग्रहही होता. ती सतत त्यांचा जप व नामस्मरण करीत असे. 'श्रीसद्गुरूंचे चरण सोडू नको' असा बोध माझी आई मला वरचेवर करीत असे (आमचे सर्व घर, मुले, मुली, सौ.गीता व सौ. इंद्रायणी, जावई, पांडुरंग सोपान पवळ आणि सुनील सोपान पवळ हे अनुग्रहित असून, सर्व घर महाराजांचे भक्त आहे). नातवंडे रोज घरात 'राजाधिराज सद्गुरूनाथ महाराज की जय' हा घोष करीत असतात. ते सर्व पाहून मला धन्य धन्य झाल्यासारखे वाटते. घरात व मुलींचे घरी श्रीसद्गुरूंची भक्ती त्या करतात व आनंदी होत असतात.असो.या ग्रंथाचे संपादानाचे काम प्रा.डॉ.के.वा.आपटे सर यांनी अतिशय परीश्रम घेऊन केले असून, त्यांना त्यांचे चिरंजीव श्री.नारायण व प.पू.सौ.मायादेवी यांनी सतत सहाय्य केले आहे. वेळोवेळी प.पू.श्रीअण्णामहाराज केळकर यांनी मला मोलाचे मार्गदर्शन केले असून, माझी पत्नी भागीरथी, माझ्या मुली कु.मुक्ता व कु.यमुना, पुत्र चि. गुरुनाथ यांनी सतत मला सहाय्य केले आहे. ही सर्व महाराजांचीच कृपा आहे असे मला वाटते. सर्व श्रीसद्गुरूंचे अनुग्रहित आहेत. ग्रंथाच्या उत्कृष्ठ छपाईचे काम गजेंद्र प्रेसचे मालक व माझे गुरुबंधू श्री. सतीश लोखंडे यांनी मोठ्या श्रद्धेने, तन्मयतेने केले आहे. महाराजांचेकडे येणारे सर्व गुरूबंधू व गुरूभगिनी यांच्या माझ्यावरील व माझ्या कुटुंबावरील असलेल्या प्रेमामुळेच हा आरतीसंग्रह ग्रंथ महाराजांचे प्रथम पुण्यतिथी सोहळ्यात साकार होत आहे.

आम्हा सर्वांवर महाराजांची कृपा सतत चढती वाढती रहावी, आमच्या सर्वांकडून भक्ती व साधन घडावे, अशी प्रार्थना करतो आणि प.पू.स.स.भगवान दासराममाऊलीचे कृपेने स्फुरलेले हे मनोगत मी आमच्या संप्रदायाचे मूळ पुरूष भगवान स्वामीसमर्थ श्रीनिंबरगीकरमहाराज यांचे चरणी अर्पण करतो.

सांगली

श्रीचरणसेवकांचा सेवक,

**कृष्णा रामचंद्र शिंगाडे**

# प्रथम आवृत्ती संपादकाचे कथन...

संस्कृतभाषेतील 'आरात्रिक' या शब्दावरून साधलेला आरती हा शब्द मराठी भाषेत प्रचलित आहे आणि काकडारती, पंचारती, धूपारती, कर्पूरारती, शेजारती इत्यादी शब्दात आरती शब्द वापरलेला आहे.

काकडारती ही पहाटे केली जाते. तर देवाला निजविण्याचा उपचार जेथे केला जातो, तेथे शेजारती म्हटली जाते. या दोन आरत्यांचे खेरीज अन्य आरतींमध्ये असे काळवेळेचे काही बंधन दिसत नाही.

देवपूजेचे अंती होणाऱ्या आरतीचे वेळी घंटानाद, इत्यादि असतो आणि उपस्थित असणारे अन्य भक्त हातांची टाळी किंवा झांज/टाळ याद्वारे तालाचा ठेका देतात. कीर्तन, भजन इत्यादिंचे अंती होणाऱ्या आरतीच्या समयी टाळ/झांज अथवा हातांची टाळी यांचा ठेका व शंख, झंगट, इत्यादिंचे नाद उपयोजिले जातात.

पूज्य/माननीय/वंद्य अशी व्यक्ती (जसे - वंदनीय स्त्री-पुरुष, गुरू, देव, साधू -संत इत्यादि) तसेच वस्तू (जसे - मूर्ती, ग्रंथ, चित्र, स्थळ, नदी, पादुका, साधुची समाधी, इत्यादि) यांना ओवाळीत त्यांचा गौरव गाणे हा आरतीचा मुख्य उद्देश दिसतो.

फार पूर्वीपासून मराठी भाषेत आरत्या रचल्या गेल्या आहेत आणि त्या नानाप्रकारच्या छंदात आहेत व त्या म्हणण्याच्या चालीही वेगवेगळ्या आहेत. तथापि, 'युगे अठ्ठावीस विटेवरी उभा' आणि 'आरती ज्ञानराजा' या प्रसिद्ध आरत्यांच्या चाली असणाऱ्या अनेक आरत्या आढळतात.

सद्यःकाळीही आरत्यांची रचना केली जात आहे. सांगली या नगरीत वास करून, नुकतेच निजधामास गेलेले संतश्रेष्ठ श्रीदासराममहाराज (श्रीरामराय गोविंद केळकर) यांच्या आध्यात्मिक लिखाणात अनेक आरत्या दिसून येतात. श्रीदासराममहाराज हे चिमड संप्रदायात कळसभूत झालेले संत होत त्यांना आपल्या संप्रदायातील सिद्ध-संतांबद्दल नितांत आदर होता. साहजिकच त्यांचा गौरव करणाऱ्या

आरत्या श्रीदासरामांचेकडून रचल्या गेल्या असतील तर त्यात नवल वाटण्याचे काहीच कारण नाही. परंतु महत्त्वाची गोष्ट अशी की, 'संतच संतांना ओळखतात' या न्यायाने आपल्या संप्रदायातील संत सोडून, इतर संतांबद्दलही श्रीदासरामांना आदर वाटत असे. म्हणून ते त्यांचेबद्दल गौरवोद्गार काढीत असत. याचे कारण एकच की, श्रीदासराममहाराज हे संप्रदायिक संकुचित वृत्तीचे नव्हते. म्हणूनच त्यांचे हातून इतर संतांविषयी आदर व्यक्त करण्यास त्या त्या संतांच्यावरच्या आरत्या लिहिल्या गेल्या.

श्रीदासराममहाराज रचित आरत्या एकत्र करून त्या लिहून ठेवण्याचा छंद श्रीदासराममहाराजांचे एक निष्ठावंत भक्त मा. श्री.कृष्णाजी रामचंद्र शिंगाडे यांना लागला होता. आपणाजवळ संग्रहित असणाऱ्या आरत्या पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याची प्रेरणा त्यांना झाली आणि त्यांनी आपला मानस मजजवळ बोलून दाखविला. तेव्हा मी त्यांना म्हटले की, श्रीदासराममहाराजांचे पारमार्थिक लिखाण असणाऱ्या ज्या वह्या आहेत, त्यातही अनेक आरत्या आहेत, त्याही घेऊन आरत्यांचे पुस्तक प्रकाशित केले तर बरे होईल. माझी ही सूचना श्री. शिंगाडे यांना पसंत पडली व मान्यही झाली. तदनंतर श्रीदासराममहाराजांच्या वही क्र.४७, ९३, १०८, १०९, १११, ११३, ११५, ११६, १२४, १२९, १३४-अ, १३५, १५८ इत्यादि वह्यातील आणि ६ लेजरबुकातील आरत्या मी लिहून काढल्या. तसेच दासराम गौरवग्रंथ, कैवल्यप्रसाद, लक्ष्मीबाई अक्का चरित्र, चिमडमहाराज चरित्र, गोविंददर्शन, श्रीधरस्वामी मोक्षगाथा इत्यादि प्रकाशित पुस्तकातून आलेल्या श्रीदासरामांच्या आरत्या मी लिहून काढल्या. अशाप्रकारे या आरत्या व श्री. शिंगाडे यांच्या संग्रहात असणाऱ्या आरत्या या एकत्र केल्यावर १५० पेक्षा अधिक आरत्यांचा संग्रह सिद्ध झाला. तोच आता येथे पुस्तकरूपाने प्रकाशित केला जात आहे.

श्रीदासराममहाराजांच्या वरील सर्व आरत्या एकत्र करून पाहिल्यावर असे दिसून आले की, या आरत्यांचे विशिष्ट पद्धतीने वर्गीकरण करता येईल. तसे वर्ग केल्यावर या आरत्यांचे पुढीलप्रमाणे १३ विभाग तयार झाले. म्हणजे आरत्यांचा विषय लक्षात घेऊन, हे १३ विभाग असे सांगता येतातः-

१. देव-देवी  २. चिमड संप्रदायातील सिद्धत्रयी  ३. निंबरगीकरमहाराज आणि त्यांचे वंशज  ४. चिमड संप्रदायातील गुरू-शिष्य परंपरेतील संत व चिमड संप्रदाय  ५. चिमड संप्रदायातील तसेच चिमड संप्रदायाशी संबंधित अन्य संत. ६. श्रीदासराममहाराजांचे कुलदेव, अन्य पूज्य देव आणि माता-पिता  ७. समर्थ रामदासस्वामी संप्रदायातील संत  ८. इंचगिरी/हिंचगिरी संप्रदायातील संत  ९. सांगली जिल्ह्यातील साधू, एक स्थळ व एक चित्र  १०. वारकरी संप्रदायातील संत ११. अन्य संत-साधू  १२. राजकारणातील महनीय पुरूष  १३. पूज्य ग्रंथ.

वर सांगितलेल्या १३ विभागातील आरत्यांच्या संदर्भात पुढील गोष्टी लक्षणीय आहेत. १. या आरत्यांमध्ये श्रीदासराममहाराजांनी स्वतःसाठी दास, राम, बालराम, दासराम, गोविंदसुत, गोविंदसुत राम आणि इंदिरासुत राम अशा मुद्रिका वापरलेल्या आहेत. इंदिरासुत आणि गोविंदसुत हे शब्द त्यांच्या मातापित्याच्या नावावरून बनलेले आहेत.  २. बहुतेक आरत्या या  'युगे अठ्ठावीस विटेवरी उभा' अथवा 'आरती ज्ञानराजा' या आरत्यांच्या चालीत म्हणता येण्यासारख्या आहेत. ३. काही आरत्या श्रीदासराममहाराजांनी स्वयंस्फूर्तीने रचलेल्या आहेत, तर काही आरत्या त्यांनी इतरांच्या विनंतीवरून रचलेल्या दिसतात.  ४. या आरत्यांमध्ये एकच पंचारती आहे.  ५. आरतीचा विषय असणारी एक वस्तू अथवा एक व्यक्ती/देव यांचेबाबतीत एकापेक्षा अधिक आरत्या कधी कधी आढळतात.  ६. सर्वात जास्त आरत्या या श्रीदासराममहाराजांचे पितृदेव श्रीमामामहाराज केळकर यांच्याविषयीच्या आहेत.  ७. ज्या मराठी शाळेत श्रीदासराममहाराजांचे प्राथमिक शिक्षण झाले, त्या शाळा नं.२ ची आरती येथे आहे.  ८. श्रीदासराममहाराजांचे पितृदेव श्रीमामामहाराज यांना आळंदी मुक्कामी श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे साक्षात दर्शन झाले होते. त्या दर्शनानंतर श्रीमामामहाराजांनी श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे रेखाचित्र काढले होते. (श्रीमामाममहाराज हे ड्रॉईंगची थर्ड ग्रेड परीक्षा पास झालेले होते). ते चित्र आजही श्रीदासराममहाराजांच्या राममंदिरातील देव्हाऱ्याच्या वरील बाजूस लावलेले आहे. त्या चित्राची एक आरती येथे आहे.  ९. काही आरत्यांचे संदर्भात स्पष्टीकरणात्मक टीपा आवश्यक आहेत.

परंतु पुस्तकाचा विस्तार वाढेल म्हणून या टीपा येथे दिलेल्या नाहीत.

प्रस्तुत आरती संग्रहात विभागवार मांडणी करताना, पुढील गोष्टी केलेल्या आहेत. १. हालसिद्ध हे रेवणसिद्धांचे अवतार मानले जातात. म्हणून हालसिद्धविषयक आरत्या चिमड संप्रदायातील सिद्धत्रयीच्या विभागात दिलेल्या आहेत. २. श्रीदासराममहाराजांच्या भिन्न वह्यांमध्ये एकच आरती अनेकदा लिहिलेली वा पुनर्रचित अशी दिसून येते. अशा ठिकाणी एका आरतीत असणारे चरण/शब्द हे दुसऱ्या आरतीत दिसून येतात. परंतु त्या उत्तरोक्त आरतीत काही चरण/शब्द वेगवेगळे दिसतात. अशा स्थळी ते चरण/शब्द पाठभेद या स्वरूपात येथे तळटीपांमध्ये नमूद केलेले आहेत. ३. ज्या आरत्यांचे संदर्भात गुरु-शिष्य क्रम, नाते-क्रम किंवा कालक्रम पाळणे शक्य होते, तेथे तो तो क्रम लक्षात घेतला आहे. ४. अन्य संत या विभागातील आरत्या संतांच्या/वस्तूंच्या नावाच्या अकारानुक्रमाने दिलेल्या आहेत. ५. इष्ट आरती त्वरित सापडावी म्हणून नावांची सूची शेवटी दिली आहे.

श्रीदासराममहाराज हे चिमड संप्रदायातील होते. त्यांच्या गुरूपरंपरेला वंदन करणाऱ्या ओव्या आरत्या संपल्यानंतर येथे दिलेल्या आहेत. तसेच श्रीदासराममहाराजांचा गौरव करणारी आरती येथेच देणे योग्य वाटल्याने, तीही येथे शेवटी दिलेली आहे. त्यानंतर प्रस्तुतच्या आरतीसंग्रहाची आरती दिलेली आहे.

प्रस्तुत आरती संग्रहाचे संपादन करताना माझी पत्नी सौ.माया व पुत्र श्री.नारायण यांनी जे सहाय्य केले, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. श्रीकृष्णाजी शिंगाडे यांचेही खूपच सहाय्य झाले आहे. तसेच त्यांनी या आरत्या संपादन करण्याची जबाबदारी मजवर सोपविली. मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहे. प्रस्तुत पुस्तकाला आपला बहुमोल ‘पुरस्कार’ देऊन, श्रीदासराममहाराजांचे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ चिरंजीव श्रीचंद्रशेखरअण्णा यांनी मला उपकृत केले आहे.

सांगली **के. वा. आपटे**

# दुसऱ्या आवृत्ती संपादकीय

आरती संग्रह हा ग्रंथ यापूर्वी श्री.कृ.रा.शिंगाडे यांनी इ.स.२००२ साली श्रीदासराममहाराज केळकर यांच्या प्रथम पुण्यतिथी दिनी प्रसिद्ध केला. या ग्रंथाचे संपादन श्रीदादांच्या अंतरंगातील शिष्य प्रा.डॉ. के.वा. आपटे तथा आमचे केशवकाका यांनी केले होते. सदर ग्रंथाच्या प्रती सध्या संपल्याने हा ग्रंथ पुर्नप्रकाशित करावा लागत आहे. प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने श्रीदादांच्या वह्यांचे अवलोकन करताना मागे प्रसिद्ध केलेल्या आरती संग्रहातील आरत्यांव्यतिरिक्त, आणखी २२ आरत्या वह्यात आढळून आल्या. या २२ आरत्या या दुसऱ्या आवृत्तीत समाविष्ट केल्या आहेत. त्यामुळे आता आरती संग्रहात पहिल्या आवृत्तीतील १५२ आरत्या तसेच या आवृत्तीत समाविष्ट केलेल्या २२ आरत्या अशा एकूण १७४ आरत्या या दुसऱ्या आवृत्तीत प्रकाशित केलेल्या आहेत.

सांगली

श्रीअण्णांचा कृपाभिलाषी

**दीपक चंद्रशेखर केळकर**

## दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशकाचे दोन शब्द

श्रीसद्गुरू दासराममहाराजांच्या प्रसादयुक्त वाणीने लिहिलेला 'आरती संग्रह' हा ग्रंथ त्यांच्या पहिल्या पुण्यतिथी रोजी म्हणजेच श्रावण वद्य शके १९२४, मंगळवार, दि.१३.०८.२००२ रोजी प्रकाशित झाला. हा ग्रंथ एक अलौकिक अध्यात्मिक असा ग्रंथ आहे. जगातील सर्व धर्माच्या, सर्व संप्रदायाच्या महान अशा महात्म्यांच्या आरत्यांचा संग्रह असणारा असणारा हा अलौकिक ग्रंथ म्हणजे माझ्या मते भूत, वर्तमानकाळात झालेला नाही व भविष्यकाळातही होईल असे वाटत नाही. प.पू.डॉ. के.वा.आपटे सर या ग्रंथाचे संपादक होते. त्यावेळी माझ्या भाग्याने हा ग्रंथ मला प्रकाशित करण्याची संधी मिळाली. हा ग्रंथ सर्व अध्यात्मिकांना खूपच आवडला.

या ग्रंथाची पहिली आवृत्ती संपल्याचे मला मा.श्री.दीपकनाना यांचेकडून समजले. दुसरी आवृत्ती काढण्याची संधीही मला द्यावी अशी विनंती मी त्यांना केली. त्याप्रमाणे त्यांनी मला ही संधी दिली. दुसऱ्या आवृत्तीमध्ये पहिल्या १५२० व नवीन २२ अशा एकूण १७४ आरत्यांचा समावेश आहे.

आमच्या घराण्यावर प.पू.सद्गुरू श्रीदासराममहाराज यांची कृपा आहे. माझा नातू कु. वेदांत राजेंद्र पाटील हा जन्माला आल्यापासून हृदयविकाराने ग्रस्त होता. परंतु प.पू.श्रीदादांच्या कृपाशीर्वादाने तो या व्याधीतून सुखरूप बाहेर पडला, परंतु चार वर्षांनी त्याला देवाज्ञा झाली. प.पू.श्रीअण्णामहाराजांचा चैतन्यरुपाने आशीर्वाद आम्हावर आहे असे मला वाटते. संपदायातील सर्व संतांची कृपा सर्वांवर रहावी अशी मी प्रार्थना करतो. या ग्रंथाच्या कामी माझे व्याही श्री. सोपानराव सयाजी पवळ, प्रा.श्री.विठ्ठलरावजी राजाराम पाटील यांचे सहाय्य, मार्गदर्शन झाले याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. भ.स. सद्गुरू श्रीगुरुलिंगजंगममहाराज व श्रीदासराममहाराज यांचे चरणी ही सेवा अर्पण करतो.

**कृष्णा रामचंद्र शिंगाडे**

सांगली. (मो.नं.८९७५३१३२८२)

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| पहिल्या आवृत्तीचा पुरस्कार (प.पू.श्रीचंद्रशेखर रामराय केळकर) | एक |
| पहिल्या आवृत्तीच्या प्रकाशकाचे मनोगत | तीन |
| प्रथम आवृत्ती संपादकाचे कथन | सात |
| द्वितीय आवृत्ती संपादकीय | अकरा |
| द्वितीय आवृत्ती प्रकाशकाचे मनोगत | बारा |

| अ.क्र. | विभागवार आरत्या | पृष्ठ.क्र. |
|---|---|---|
| ०१. | देव- देवी ... ... ... ... | ०१ |
| ०२. | चिमड संप्रदायातील सिद्धत्रयी... ... ... | ०४ |
| ०३. | निंबरगीकरमहाराज आणि त्यांचे वंशज... | १० |
| ०४. | चिमड संप्रदायातील गुरूपरंपरेतील संत व चिमड संप्रदाय | १४ |
| ०५. | चिमड संप्रदायातील व चिमड संप्रदायाशी संबंधित अन्य संत | १९ |
| ०६. | श्रीदासरामांचे कुलदेव, अन्य पूज्य देव आणि माता-पिता | २२ |
| ०७. | समर्थ रामदासस्वामी संप्रदायातील संत... | ३२ |
| ०८. | इंचगिरी/हिंचगिरी संप्रदायातील संत ... ... | ३४ |
| ०९. | सांगली जिल्ह्यातील संत, साधू, एक स्थळ व एक चित्र | ३८ |
| १०. | वारकरी संप्रदायातील संत ... ... ... ... | ४७ |
| ११. | अन्य संत साधू ... ... ... ... ... | ५५ |
| १२. | राजकारणातील महनीय पुरूष... ... ... | ६७ |
| १३. | पूज्य ग्रंथ ... ... ... ... ... | ६९ |

**श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र. ८६**

**श्रीदासराममहाराज केळकर कृत**

# आरती संग्रह

**प्रकाशक :**
श्री. कृष्णाजी रामचंद्र शिंगाडे
दासराम-सीतामाऊली प्रसाद, प्लॉट नं.१६,
क्रांतीनगर, चुनाभट्टी मागे, वानलेसवाडी, सांगली ४१६४१४

**संपादक :**
**श्री. दीपक चंद्रशेखर केळकर**
घ.नं.८२७, श्रीराम निकेतन,श्री.बापूरावजी केळकर वाडा,
सेनामंदिर रोड, गावभाग, सांगली ४१६४१६.

प्रकाशन दिन : मार्गशीर्ष शु. ११, शके १९४२ शुक्रवार दि. २५.१२.२०२०
(प.पू.सद्गुरू श्रीरामचंद्रावजीमहाराज यरगट्टीकर पुण्यतिथी)

प्रथम आवृत्ती : इ.स. २००२

द्वितीय आवृत्ती : इ.स.२०२०

**© सर्व हक्क श्री. दीपक चंद्रशेखर केळकर यांचे स्वाधीन**

**अक्षर जुळणी :**
पॉप्युलर एस.ॲण्ड टी. इन्स्टिटस्यूट, सांगली
**श्री.भालचंद्र विनायक सहस्रबुद्धे**

**मुद्रक :** एस. बी. ऑफसेट प्रिंटर्स, वखारभाग, सांगली

प्रसाद मूल्य : रु.५०/-

**प्रत मिळणेचे ठिकाण :**
श्री. दीपक चंद्रशेखर केळकर
घ.नं.८२७, श्रीराम निकेतन,श्री.बापूरावजी केळकरवाडा,
सेनामंदिर रोड, गावभाग, सांगली ४१६४१६.
दूरध्वनी :०२३३-२३३१७४७ भ्रमणध्वनी : ९८२२००७५२८ / ९४२०५७४५७०

|| श्रीराम ||

श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प क्र. ८६

श्रीदासराममहाराज केळकर कृत

# आरती संग्रह

संपादक (प्रथम आवृत्ती)

प्रा.डॉ. के. वा. आपटे

संपादक (द्वितीय आवृत्ती)

श्री. दीपक चंद्रशेखर केळकर

प्रकाशक

श्री. कृष्णाजी रामचंद्र शिंगाडे

आवृत्ती दुसरी सांगली सन २०२०